नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक ४५ * | * अमरावती * | शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## भारत माता की जय !

आपल्याला स्वातंत्र्य मिळून अठ्याहत्तर वर्षे झाली आहेत. या ७८ वर्षांमध्ये भारताने जी प्रगती केली आहे ती निश्चितच अभिमानास्पद आहे. १९४७ पर्यंत आपण प्रत्येक बाबीसाठी इंग्रजांवर अवलंबून होतो, इंग्लंडला दुसऱ्या महायुद्धात विजय मिळवून देणाऱ्या चर्चिल यांनी तर भारतातील लोक राज्य करण्या लायक नाहीत, असे विधान केले होते. मात्र गेल्या ७८ वर्षांमध्ये भारताने काही बाबतीत चर्चिलचा निश्चितच पराभव केलेला आहे? पण आपली जगातील सर्वात मोठी लोकशाही ज्या मार्गावरून जात आहे. तो मार्ग सध्यातरी प्रचंड खाचखळग्यांनी भरून गेलेला दिसून येत आहे. निवडणुकीच्या रिंगणात ६०-७० वर्षांपूर्वी उमेदवारांचा खर्च पाच ते दहा हजार रुपयांच्या वर नव्हता, काही उमेदवार तर हजार रुपयाच्या आत खर्च करूनही निवडून आलेले आम्ही पाहिलेले आहेत. आता कुणाला आमदार व्हायचे असेल तर दहा-पंधरा कोटी रुपये खर्च केल्याशिवाय निवडणूक लढविता येत नाही. काही वर्षांपूर्वी नागपूर शहरात किंवा इतरत्रही कार्यकर्ते अगदी कच्चा चिवडा खाऊन काम करत असत. उमेदवार बऱ्यापैकी श्रीमंत असला तर साध्या जेवणाची व्यवस्था नक्की होत असे. तो काळच वेगळा होता, तेव्हा कार्यकर्ता उमेदवाराकडून कोणतीही आर्थिक अपेक्षा ठेवणारा नव्हता. तेव्हा पक्षनिष्ठा होती, नेता निष्ठा होती आणि लाजलज्जाही होती. आताचे चित्र मात्र केवळ चिंताजनक नाही तर अगदी लाजिरवाणे आहे. काही अपवाद वगळता कार्यकर्त्यांसाठी सध्याच्या परिस्थितीत शेकडो गाड्या लावाव्या लागतात. साग्रसंगीत भोजनाची व्यवस्था करावी लागते सोबत अनेक गावात दक्षिणाही वाटावी लागते त्याशिवाय निवडणुकीत तुमची नाव तरंगू शकत नाही. आपल्या लोकशाहीचे गुणगान करताना निश्चितच आपली छाती अभिमानाने भरून येते, तो अभिमान आपल्या ठायी पाहिजेच पण आता निवडणुकीच्या बाजारात तुमचे मोल तुमच्या कार्यावर अवलंबून नाही, तुम्ही केलेल्या जनसेवेवरही अवलंबून नाही तर तुम्ही किती लक्ष्मीदर्शन करविता यावर अवलंबून आहे. स्वातंत्र्याची आजची सकाळ उद्यापेक्षा बरी आहे असे म्हणण्याची वेळ आता आली आहे. कशात सुख मानायचे आणि कशासाठी शोक व्यक्त करायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. तरीही आज आपल्या तिरंग्याला मानवंदना द्या, जो तुम्हाला झेलत असेल त्याला मान द्या आणि कुणी पेलत असेल तर अर्थवादी व्हा. आपले स्वातंत्र्य चिरकाल टिकणारे आहे, त्यामुळे मनात कोणतेही भय न बाळगता भारत माता की जय! म्हणा आणि आपल्या जीवनात विजय मिळवा.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## भारतीय सैन्याकडून सीमेपलीकडील
# दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :** ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्राला संबोधित केले. २४ मिनिटांच्या भाषणात त्यांनी ऑपरेशन सिंदूर, काश्मीर रेल्वे प्रकल्प, विकास, लोकशाही आणि अर्थव्यवस्था यासारख्या विषयांवर भाष्य केले.

त्या म्हणाल्या, या वर्षी आपल्याला दहशतवादाचे दुःख सहन करावे लागले. पहलगाम हल्ला भ्याड आणि अमानवी होता. त्याला उत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरमध्ये सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. आत्मनिर्भर भारत मिशनची चाचणी घेण्याची ही एक संधी होती.

राष्ट्रपती पुढे म्हणाल्या, काश्मीर खोऱ्यात रेल्वे सेवा सुरू करणे ही एक मोठी कामगिरी आहे. यामुळे त्या भागात व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळेल. आयुष्मान योजनेचा ५५ कोटी लोकांना फायदा झाला आहे. त्यांनी असेही म्हटले की, भारत लोकशाहीची जननी आहे, संविधान आपल्यासाठी सर्वोपरि आहे.



त्या पुढे म्हणाल्या, आपल्या संविधानात चार मूल्यांचा उल्लेख आहे, जे आपल्या लोकशाहीला मजबूत ठेवणारे चार आधारस्तंभ आहेत. ही मूल्ये म्हणजे न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता. या सर्व मूल्यांमध्ये व्यक्तीच्या प्रतिष्ठेची संकल्पना आहे. आपण आपल्या लोकशाहीवर आधारित संस्था निर्माण केल्या, ज्यामुळे लोकशाहीचे कामकाज बळकट झाले. आपले संविधान आणि लोकशाही आपल्यासाठी सर्वोपरि आहे. आपण फाळणीचे दुःख कधीही विसरू नये.

त्या पुढे म्हणाल्या, आज आपण फाळणीचा भयानक स्मृतिदिन साजरा केला. फाळणीत भयानक हिंसाचार झाला आणि लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागले. आज आपण इतिहासाच्या चुकांचे बळी ठरलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करतो. स्वातंत्र्य परत मिळवल्यानंतर, आपण अशा मार्गावर निघालो जिथे सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार होता.

दुसऱ्या शब्दांत, आपण स्वतःला आपले नशीब घडवण्याचा अधिकार दिला. अनेक लोकशाही व्यवस्थांमध्ये, लिंग, धर्म आणि इतर कारणांवरून लोकांना मतदान करण्यावर निर्बंध होते. परंतु आपण ते केले नाही. आव्हाने असूनही, भारतीयांनी लोकशाही यशस्वीरित्या स्वीकारली, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## किश्तवाडमध्ये ढगफुटी
## ४३ जणांचा मृत्यू



■ **वृत्तसंस्था, जम्मू, दि. १४ :** जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवार जिल्ह्यातील पद्दार उपविभागात गुरुवारी दुपारी १२:३० वाजता ढगफुटी झाली. त्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. पीटीआय वृत्तसंस्थेनुसार, आतापर्यंत ४३ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हा आकडा वाढू शकतो. २५ जण जखमी आहेत. तथापि, प्रशासनाने आतापर्यंत मृतांची संख्या निश्चित केलेली नाही. या घटनेतून आतापर्यंत ६५ जणांना वाचविण्यात यश आले आहे.



पद्दारच्या चाशोटी गावात ढगफुटी झाली. हे ठिकाण माचैल माता मंदिराचे प्रारंभ केंद्र आहे. धार्मिक यात्रेसाठी येथे अनेक लोक जमले होते. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. दरवर्षी ऑगस्टमध्ये माचैल माता तीर्थयात्रा होते. हजारो भाविक येथे येतात. हा मार्ग २५ जुलै ते ५ सप्टेंबर पर्यंत चालेल. हा मार्ग जम्मू ते किश्तवार पर्यंत २१० किमी लांबीचा आहे.

### सुटीची सूचना

**भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

■ व्यवस्थापक

## ८६ व्या शौर्य पुरस्काराची घोषणा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :** ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य आणि धाडस दाखवणाऱ्या ७० सशस्त्र दलाच्या जवानांना शौर्य पुरस्कार देण्याची घोषणा स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला करण्यात आली आहे. हवाई दलाच्या ३६ जवानांना शौर्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

९ हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना वीर चक्राने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील मुरीदके आणि बहावलपूरमधील दहशतवादी अड्डे नष्ट करणाऱ्या लढाऊ वैमानिकांचा समावेश आहे. वीर चक्र हे युद्धादरम्यान दिले जाणारे तिसरे सर्वोच्च शौर्य पदक आहे.

## पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी १२ व्यांदा तिरंगा फडकवणार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :** १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकावतील आणि राष्ट्राला संबोधित करतील.



यावेळीची थीम 'नवीन भारत' आहे. मोदी दिल्लीतील लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून सलग १२ व्या वेळी राष्ट्राला संबोधित करतील. त्यांच्या भाषणाद्वारे पंतप्रधान आंतरराष्ट्रीय समुदायाला भारताचे दृष्टिकोन देतील.



## रायगड जिल्ह्यातील बसस्थानकांच्या नुतनीकरणाची कामे पूर्ण करावे : आदिती तटकरे



**मुंबई :** रायगड येथील रोहा, म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव, तळा येथील नागरिकांच्या सुविधेसाठी बसस्थानाकाच्या नुतनीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. श्रीवर्धन येथील रोहा, तळा, माणगांव, श्रीवर्धन, म्हसळा येथील एस.टी.डेपोच्या दुरूस्तीच्या कामासंदर्भात आज मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे, मुंबई सेंट्रलचे व्यवस्थापकीय संचालक, विभागीय नियंत्रक आणि डेपो मॅनेजर उपस्थित होते. मंत्री तटकरे म्हणाल्या की, तळा येथील वाहनतळ समतल करण्याचे काम पूर्ण झाले असून, कुपणभिंत, प्रसाधनगृह व त्यावर चालक/मालकाचे विश्रांतीगृहाचे नुतनीकरण कामकाजासाठी अंदाजपत्रक सादर करावे. तसेच रोहा येथील कामकाजासाठी रस्त्यांची डागडुजी आणि निवासस्थानाच्या कामकाजासाठी वेगळे अंदाजपत्रक तयार करावे. माणगाव बसस्थानकात बैठक व्यवस्थेचे काम पूर्ण असून, उर्वरित काम तातडीने पूर्ण करावे.

## 'अपना भांडार'च्या माध्यमातून खरेदी विक्रीची साखळी उभारणार : जयकुमार रावल



**मुंबईः** राज्यात महाराष्ट्र सहकारी ग्राहक महासंघाच्या माध्यमातून शेतकरी आणि ग्राहक या दोन्ही घटकांचा लाभ होईल, या उद्देशाने 'अपना भांडार' या नावाने बहुउद्देशीय ग्राहक भांडारे चालवली जातात. भविष्यात सर्व जिल्ह्यांमध्ये अशी भांडारे उभारून खरेदी-विक्रीची साखळी उभारण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. महाराष्ट्र सहकारी ग्राहक महासंघाच्या कामकाजाचा मंत्री रावल यांनी मुंबईतील महासंघाच्या कार्यालयात जाऊन आढावा घेतला. यावेळी महासंघाच्या प्राधिकृत समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले, कार्यकारी संचालक विकास रसाळ, महासंघाचे संचालक जयसिंग गिरासे, संचालक गोकुळ परदेशी यांच्यासह संबंधित पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते. पणन मंत्री रावल म्हणाले, महासंघाच्या मालकीच्या जागांचा पुनर्विकास करुन त्या सुस्थितीत करुन घेणे गरजेचे आहे.

## तरच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार

### रोहित पवारांचं सूचक वक्तव्य



**मुंबई :** राज आणि उद्धव ठाकरे मराठीच्या मुद्द्यावर तब्बल २० वर्षांनी एकत्र आले, त्यामुळे मनसे-शिवसेना ठाकरे गट युतीच्या चर्चेला जोर चढला आहे. पण, राजकीय वतुळांत आता आणखी एक स्फोटक चर्चा सुरू झाली आहे–दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र येणार का? या प्रश्नावर आमदार रोहित पवार यांनी दिलेलं उत्तर महायुतीच्या राजकारणात हलकल्लोळ माजवणारं ठरतंय. राष्ट्रवादी काँग्रेसच्या २०२३ मधील फुटीनंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट वेगळे झाले. मात्र, काही दिवसांपासून दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेवर कुजबुज सुरू आहे. भंडाऱ्यातील शेतकरी मोर्चा व मंडल यात्रेत भाषण करताना रोहित पवारांनी या चर्चेला थेट हवा दिली. ते म्हणाले– "जनतेची आणि कार्यकर्त्यांची इच्छा असेल, तर दोन्ही गट एकत्र येऊ शकतात पण त्यासाठी अजित दादांनी भाजपची साथ सोडली पाहिजे.

## ताजनापूर उपसा सिंचन टप्पा-१ सुप्रमासाठी प्रस्ताव सादर करावा : राधाकृष्ण विखे-पाटील



**मुंबईः** ताजनापूर उपसा सिंचन टप्पा-१ मधील अस्तित्वात असलेल्या घटकांचा वापर करून प्रस्तावित १३ गावांच्या योजनेचे संकल्पन तातडीने पूर्ण करावे. तदनंतर या योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा. या प्रस्तावास शासनस्तरावरून मंजुरी दिली जाईल असे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृह येथे ताजनापूर उपसा सिंचन टप्पा-१ (ता. शेवगाव जि. अहिल्यानगर) या बंद असलेल्या योजनेच्या शिल्लक असलेल्या पाण्यातून शेवगाव पाथर्डी मतदार संघातील पूर्व भागातील दुष्काळग्रस्त/टंचाईग्रस्त गावांचा समावेश करून योजना पुनश्च सुरू करणे संदर्भात बैठक झाली. बैठकीस आमदार श्रीमती मोनिका राजळे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे आदी उपस्थित होते.

## झाडाला धडकून उलटली बस



### चार प्रवासी गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
उमराणे, दि. १४ :

मालेगावकडे जाणाऱ्या एका भरधाव बसचा मुंबई-आग्रा महामार्गावर उमराण्याजवळ भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यालगतच्या एका झाडाला धडक दिली. त्यांनतर उलटली. यात चार प्रवासी गंभीर तर १२ ते १५ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, काही प्रवाशांनी चालकाला डुलकी लागल्याचा आरोप केला आहे. तर चालक सचिन शेळके याने दुचाकीस्वाराला वाचविताना अपघात घडल्याचा दावा केला आहे.

मुरबाड येथून नावी, जळगाव येथे निघालेली बस (एमएच १४ एएच ०४८३) मुंबई-आग्रा महामार्गावरून जात असताना, उमराण्याजवळ सोनाई काट्याजवळ हा बुधवारी (दि. १३) दुपारी दीड वाजता अपघात घडला. वेगामुळे चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस १०० ते १५० मीटर पुढे जाऊन रस्त्याच्या खाली उतरली. त्यानंतर ती एका झाडाला धडकली आणि उलटली.

अपघातात चालक सचिन शेळके, विशाल सराफ (४३, रा. जळगाव, मिनाक्षी सराफ (४२, जळगाव), अर्चना पाटील ( ५०), रुक्माबाई शेवाळे (६६, रा. मुक्ताईनगर), अथर्व अजय महाले (३,रा. विजयनगर नाशिक), निंबाबाई माणिक शेवाळे (८५, सोनगाव, ता. मालेगाव) सुभाष चिंतामण कापूरे (७५, वहाळ, ता. चाळीसगाव) हे जखमी झाले.

# बिग आयडियाज ब्रेनस्टॉर्मिंग कार्यशाळा

## राज्याच्या दीर्घकालीन विकास आराखड्यासाठी उपयुक्त : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :




विकसित महाराष्ट्र २०४७ - बिग आयडियाज ब्रेनस्टॉर्मिंग कार्यशाळेत मांडण्यात येणाऱ्या संकल्पना या महाराष्ट्र राज्याच्या दीर्घकालीन विकास आराखड्यासाठी उपयुक्त आहेत. या कार्यशाळेतील चर्चेतून मांडलेल्या संकल्पना पुढील २०-२५ वर्षांसाठी प्रभावी दस्तावेज तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्धार असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सह्याद्री अतिथिगृह येथे नियोजन विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विकसित महाराष्ट्र २०४७ - बिग आयडियाज ब्रेनस्टॉर्मिंग कार्यशाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विकसित भारत घडवण्यासाठी महाराष्ट्राने सर्वाधिक चांगली कामगिरी करणे आवश्यक आहे. त्यामुळेच नीती आयोगाने महाराष्ट्राबाबत विशेष लक्ष दिले आहे. या संवाद प्रक्रियेतून राज्याच्या विकासाला चालना देणाऱ्या मोठ्या कल्पना समोर येतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.


नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम म्हणाले, व्हिजन तयार करण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तयारी झाली आहे. मंत्रालयातील विविध विभागाच्या सचिवांसह लाखो लोकांच्या सूचना मिळाल्या आहेत. त्या माहितीतून त्याची प्रकरणे (चॅप्टर्स) तयार झाले असून ते सध्या मसुदा अवस्थेत आहेत. राज्याचे रूपांतर घडवून आणण्यासाठी काही मोठ्या कल्पना, जलद अंमलबजावणी योग्य उपाय सुचवणे हे या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट होते. ही चर्चा सचिवांनी आजवर जे काम केले आहे,

त्याचाच एक भाग आहे. या सर्व कल्पना एकत्र करून, त्या योजनामध्ये समाविष्ट केल्या जातील आणि त्याचा पहिला मसुदा सादर करण्यात येईल, असे सुब्रह्मण्यम यांनी सांगितले. या कार्यशाळेत रोजगार संधी, पायाभूत सुविधा, सक्षमीकरण आणि जीवनमानाची गुणवत्ता, संस्थात्मक क्षमता आणि सुशासन या प्रमुख चार मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मुख्य सचिव राजेशकुमार, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, मुख्यमंत्री यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्योग विभाग, वित्त विभागाचे, अपर मुख्य सचिव, सचिव तसेच आरपीजी ग्रुप, अर्थ ग्लोबल, राजेश ग्रुप यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी याच बरोबर कृषी, शिक्षण, आरोग्य, बँक, विमा आदी क्षेत्रातील कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आरती साठे यांची न्यायाधीशपदी नियुक्ती कायम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :



भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांची न्यायाधीशपदावरील नियुक्ती कायम करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी विविध प्रश्न उपस्थित करत ही नियुक्ती न्यायव्यवस्थेची पारदर्शकता, सेपरेशन ऑफ पॉवरचे (शक्तींचे पृथ्थकरण) तत्व व एकंदरीतच संविधानाला तडा देणारी असल्याची टीका केली आहे.

भाजपच्या माजी प्रदेश प्रवक्त्या अॅड. आरती साठे यांच्यासह ज्येष्ठ वकील सुशील मनोहर घोडेस्वार व अजित कडेठाणकर या तिघांची उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या तिघांच्या नियुक्तीचे आदेश जारी केले. अतिरिक्त न्यायमूर्तींची नियुक्ती 2 वर्षांसाठी असते. पण त्यानंतर त्यांना कायम केले जाते. साठे यांच्या नियुक्तीस काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासह विविध राजकीय पक्षांनी आक्षेप घेत सरन्यायाधीशांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी आपली वरील भावना व्यक्त केली आहे.

## एकनाथ शिंदे नाराजीचे स्वयंघोषित ब्रँड ॲम्बेसेडर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



### ठाकरे गटाचा हल्लाबोल

सत्ता हाती घेतल्यानंतर जनतेसाठी काय भले केले, हा प्रश्न महायुती सरकारसमोर आजही अनुत्तरित आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या तिढ्यातून राजकीय कुरघोड्या, पाय खेचणे आणि नाराजीच्या खेळातच मंत्र्यांचा वेळ जात आहे. यात उपमुख्यमंत्री शिंदे हे नाराजीचे स्वयंघोषित ब्रँड ॲम्बेसेडर ठरले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारून ते थेट श्रीनगरला गेले, तर त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्ली गाठून भाजप नेतृत्वावर तक्रारींचा पाढा वाचला. सरकारच्या या रोजच्या नाराजी नाट्यात जनहिताचे विषय मात्र मागे पडले आहेत, अशी टीका ठाकरे गटाने सामना अग्रलेखातून केली आहे.

राज्यात मिंधे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यापासून जनतेचे काय भले झाले? होणार तरी कसे? सत्ता उपभोगणाऱ्या घटक पक्षांना आणि त्यांच्या कर्त्याधर्त्यांना तसे वाटायला तर हवे? वाटले तरी आपापसातील कुरघोड्या आणि कुरबुरींमधून वेळ तर मिळायला हवा? यांचा सगळा वेळ आणि शक्ती एकमेकांचे पत्ते कापण्यात, शह-काटशह करण्यात, परस्परांवर कुरघोड्या करण्यात, एकमेकांचे पाय खेचण्यात आणि नाराजीचा राग आळवण्यातच जात आहे. या नाराजी नाट्यामध्ये प्रमुख भूमिका करणारे उपमुख्यमंत्री मिंधे हे नेहमीप्रमाणे आघाडीवर आहेत. सरकारमधील अंतर्गत नाराजीचे ते स्वयंघोषित ब्रँड ॲम्बेसेडरच आहेत. त्यामुळे त्यांना अनेकदा नाराजीची उचकी लागत असते आणि ती दाखवून देण्याचा त्यांचा उद्योग सुरू असतो, असे अग्रलेखात म्हटले आहे. आताही त्यांना अशीच उचकी लागली आणि मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीला ते गैरहजर राहिले. ते म्हणे थेट श्रीनगरला जाऊन बसले आहेत. श्रीनगरात ते कशासाठी गेले? एकतर त्यांनी कामाख्या मंदिरात अघोरी पूजेसाठी आसाम-गुवाहाटीला जायला हवे होते. नाहीतर त्यांचे नाराजीनंतरचे दुसरे यशस्वी ठिकाण साताऱ्यातील दरे गावी जायला हवे होते, पण नाराज मिंधे गेले थेट श्रीनगरात.

## ई- हक्क प्रणालीच्या माध्यमातून सव्वा लाख अर्ज

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १४ :

ई-हक्क प्रणालीमुळे गेल्या नऊ महिन्यांत विविध प्रकारचे एक लाख २१ हजार अर्ज जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यात पुणे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या वतीने ई हक्क प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना नोंदीसाठी तलाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता नसून, घरात बसून अर्ज करता येणे शक्य झाले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यांतून एक लाख २१ हजार ८९९ नागरिकांनी विविध नोंदीसाठी अर्ज केले आहेत. त्यात ९८ हजार २१५ अर्जांनुसार नोंदी मंजूर करण्यात आल्या असून, त्यानुसार प्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

## कबुतरखाना व मांसबंदीवरून राज ठाकरे आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



मुंबईतील दादर कबुतर खान्यावरून पेटलेल्या वादावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया दिली. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसारच वागण्याचा सल्ला देत, बंदी असेल तर जैन मुनींनीही त्याचा विचार करावा. कबुतरांमुळे होणाऱ्या रोगांबाबत डॉक्टरांनी इशारे दिले आहेत, तरीही कोणी खायला घालत असेल तर पोलिसांनी कारवाई करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

राज ठाकरे म्हणाले, न्यायालयाचा आदेश असताना आंदोलन झाले, पण सरकारने तत्काळ कारवाई केली नाही.

उलट राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा आंदोलनात सहभागी झाले. त्यांना कोटार्चा आदेश माहीत नाही का? ते राज्याचे मंत्री आहेत, कुठल्या धमार्चे प्रतिनिधी नाहीत, हे त्यांनी लक्षात ठेवावे. काल मराठी लोकांनी आंदोलन केले तेव्हा मात्र धरपकड व पत्रकारांवर मारहाण झाली.

## मतदार यादीत एकाच महिलेचे सहा वेळा नाव

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १४ :

देशभरातील मतदार यादीतील गोंधळावरून विरोधक आक्रमक झाले असतानाच, पालघर जिल्ह्यात नालासोपारा मतदार संघातील एकाच महिलेचे नाव मतदार यादीत तब्बल सहा वेळा आढळले आहे. प्रत्येक नोंदीसाठी वेगवेगळा (मतदार ओळखपत्र) क्रमांक असल्याने या प्रकरणाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या गंभीर चुकीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

मतदार यादीतील गोंधळावरून विरोधकांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. मागील आठवड्यात काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमितता उघड करत हा मुद्दा जोरात उपस्थित केला होता. त्यानंतर संसदेत तसेच रस्त्यावरही विरोधी पक्षांकडून आंदोलन करण्यात येत आहे.

त्यातच आता नालासोपारा मतदारसंघात 2024 विधानसभा निवडणुकीच्या मतदार यादीत एका 39 वर्षीय महिलेचे नाव तब्बल सहा वेळा आढळून आले आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक नोंदीसमोर वेगळा ईपीआयसी क्रमांक दिला आहे. यापैकी पाच नोंदी एकाच मतदान केंद्रावर, तर एक नोंद दुसऱ्या मतदान केंद्रावर आहे. सोशल मीडियावर या सर्व नोंदींचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी याप्रकरणी सोशल मीडिया फोटो पोस्ट केला. पालघरमधील मतदार यादीत सुषमा गुप्ता या मतदाराचे नाव तब्बल सहा वेळा आले आहे. विशेष म्हणजे मतदार क्रमांकही वेगळा आहेत. निवडणूक आयोगाचा ४५ दिवसात सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याच्या निर्णयाला असे नावं कारणीभूत असतील का? असा सवालही शेळके यांनी केला आहे. तर ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी जयश्री शेळके यांची पोस्ट रीट्वीट करत 'व्होट चोरी एक्सपोज्ड' असे म्हटले आहे.

## वनक्षेत्रालगतची खासगी जमीन सरकार घेणार लीजवर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १४ :

राज्य शासनाचा वन विभाग आता राज्यातील वनक्षेत्रांच्या आसपासची खासगी जमीन लीजवर घेणार आहे. यासाठी मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना-२०२५ चा आराखडा तयार करण्यात आला असून लवकरच त्याची तांत्रिक छाननी झाल्यानंतर तो जनतेसमोर हरकती व सूचनांसाठी मांडला जाणार आहे. या योजनेला अंतिम मंजुरी मंत्रिमंडळाकडून दिली जाईल.

राज्यात वारंवार वन्यजीवांच्या हल्ल्यांमुळे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होत असते. यासंदर्भात वनमंत्री गणेश नाईक यांनीही पावसाळी अधिवेशनात मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी आणि या घटनांना आळा घालण्यासाठी. खासगी जमीन लीजवर घेऊन तिचा वापर विशिष्ट प्रकल्पांसाठी करण्यासंदर्भात योजना तयार करणार असल्याचे आश्वासन दिले होते. राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीचे अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्यासंदर्भात योजना तयार करणार निर्देश दिले होते.

## डॉ. प्रिन्स अजयकुमार तेजराम आगाशे

### सर्वोत्कृष्ट दूरदर्शी ग्रंथपाल पुरस्कार २०२५ ने सन्मानित




■ महासागर प्रतिनिधी
धाराशिव, दि. १४ :

नागपूर येथील मातृ सेवा संघ समाजकार्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल (प्रोफेसर ग्रेड) डॉ. प्रिन्स अजयकुमार तेजराम आगाशे यांना ग्रंथालय विज्ञान, डिजिटल ज्ञान व्यवस्थापन आणि नाविन्यपूर्ण ग्रंथालय सेवांमध्ये त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट दूरदर्शी ग्रंथपाल पुरस्कार २०२५प्रदान करण्यात आला आहे.

८ ऑगस्ट २०२५ रोजी कळंब, जिल्हा धाराशिव येथील एस. एम. ज्ञानदेव मोहोकर महाविद्यालयात आयोजित ज्ञानाचे जतनः ग्रंथालयांमध्ये डिजिटल संग्रहण या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा कार्यक्रम एस. एम. ज्ञानदेव मोहोकर महाविद्यालय, कळंब, एस. जी. आर. जी. शिंदे महाविद्यालय, परांडा आणि सॉफ्टेक सोल्युशन, पुणे यांनी संयुक्तपणे आयोजित केला होता. देशभरातील नामांकित शिक्षणतज्ज्ञ, ग्रंथालय व्यावसायिक आणि संशोधकांनी या चर्चासत्रात भाग घेतला आणि डिजिटल जतन, संग्रह तंत्रज्ञान आणि डिजिटल युगातील ग्रंथालयांचे भविष्य यावर विचारांची देवाणघेवाण केली.

आपल्या स्वीकार भाषणात, डॉ. आगाशे यांनी आयोजकांचे आभार मानले आणि पारंपारिक ज्ञान जतन आणि आधुनिक डिजिटल नवोपक्रमांमधील दरी भरून काढण्यात ग्रंथालयांच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला.

हा पुरस्कार डॉ. आगाशे यांच्या प्रतिष्ठित कारकिदीर्तील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे त्यांनी ग्रंथालयाच्या क्षेत्रात एक विचारवंत आणि दूरदर्शी म्हणून आपली छाप उमटवली आहे. ते महाविद्यालयाचे आणि संस्थेचे माननीय व्यवस्थापन सदस्य, आदरणीय प्रिन्सिपल, ग्रंथपाल वर्ग आणि त्यांच्या कुटुंबियांना श्रेय देतात.

## नागरिकांना सकस व निर्भेळ प्रतीचे अन्न उपलब्ध करून देण्यास प्राधान्य : धीरज कुमार

# सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा अभियान शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :




राज्यातील नागरिकांना सकस व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे 'सणासुदीचे विशेष तपासणी अभियान' राबविण्यात येणार आहे. ग्राहकांना निर्भेळ शुद्ध, स्वच्छ व उत्तम प्रतीचे अन्न उपलब्ध करून देण्याचे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव धीरज कुमार यांनी केले.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने आयोजित "सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षितता अभियान" शुभारंभ अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव धीरज कुमार यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सेंटर येथे करण्यात आला. या अभियानांतर्गत अन्न व्यवसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राज्यातील नागरिकांना सकस व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'सणासुदीचे विशेष तपासणी अभियान' राबविण्यात येणार आहे.

सचिव धीरज कुमार म्हणाले की, सणासुदीच्या कालावधीमध्ये नागरिकांना निर्भेळ सकस व शुद्ध अन्न उपलब्ध करून देण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे गालबोट लागणार नाही याची दक्षता अन्न व्यावसायिकांनी घ्यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून जनजागृती, प्रशिक्षण अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्यात पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर तसेच इतर शहरातही अशाप्रकारचे प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता आहे. अन्न व्यवसायिकांनी आपल्यामध्ये असलेल्या कल्पना, विचार आहेत ते कृतीत आणावे. अन्न व औषध प्रशासन मंत्री व राज्यमंत्री यांच्या निदेर्शानुसार विभागाने पुढे येऊन काम करावे व अंमलबजावणीमध्ये अग्रस्थानी राहिले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राज्यात अन्न तपासणी लॅबची संख्या वाढवत आहोत. विभागासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्राहकांना निर्भेळ शुद्ध ,स्वच्छ व चांगल्या प्रतीचे अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व्यवसायिकांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे ते आत्मसात करून कृतीमध्ये आणावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दि. ११ ऑगस्ट ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या "सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षितता अभियान" या अभियानातून अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत अंमलबजावणी, जनजागृती आणि प्रचार-प्रसिद्धी या तीन मुख्य घटकांवर भर दिला जाणार आहे. अन्न व्यवसायिकांनी कायद्याच्या सर्व तरतुदींचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

गणेशोत्सव, ईद, नवरात्रौत्सव, दसरा, दिवाळी या सणांच्या काळात मिठाई, मोदक, फराळ, प्रसाद या सारख्या खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. या वाढत्या मागणीत काही अन्न व्यावसायिकांकडून अयोग्य किंवा भेसळयुक्त अन्न तयार व विक्री होण्याचा धोका असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. अभियानाच्या काळात सार्वजनिक गणेश मंडळे, मिठाई उत्पादक, मोदक व फराळ तयार करणारे महिला बचत गट अन्न स्वच्छतेवरील कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत.

## दस्त नोंदणी ठप्प

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

दस्त नोंदणीची सर्व सरकारी कामे पुढील तीन दिवस पूर्णपणे ठप्प होणार आहेत. नोंदणी विभागाच्या सर्व्हरवर तांत्रिक देखभाल व दुरुस्तीचे मोठे काम हाती घेण्यात आले असून, त्याचा परिणाम थेट आय-सरीता प्रणालीवर होणार आहे.

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे उदयराज चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ ऑगस्टच्या मध्यरात्री १२ वाजल्यापासून ते १७ ऑगस्टच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत दस्त नोंदणीसह इतर सर्व अनुषंगिक सेवा बंद राहतील. यात प्रॉपर्टी नोंदणी, संबंधित कागदपत्रांची नोंद, तसेच इतर महत्वाच्या ऑनलाईन सेवा थांबणार असल्याने, संबंधित पक्षकार, वकील, बिल्डर्स, व्यावसायिक यांना मोठा फटका बसणार आहे. आधीच नोंदणीसाठी तारखा मिळवणे अवघड असताना, अचानक आलेल्या या तीन दिवसांच्या बंदीमुळे अनेकांचे व्यवहार अडकण्याची शक्यता आहे.

महासागर
शुक्रवार, दि. 15 ऑगस्ट 2025
अमरावती


# परवाना नसतानाही मद्यपींना सर्रास विक्री

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष, कायद्याचा बोजवारा

महासागर प्रतिनिधी

पथ्रोट,( दि.14 ) - राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कठोर नियमावलीनुसार केवळ परवाना असलेल्या व्यक्तीलाच दारू विक्री करता येते, अन्यथा विक्रेत्यावर 25 ते 30 हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. मात्र प्रत्यक्षात जिल्ह्यात बहुतेक मद्यविक्रेते नियमांचे पालन करत नसून, परवाना नसतानाही कोणीही सहजपणे दारू खरेदी करू शकतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



दारू पिण्यासाठी किंवा खरेदीसाठी 21 वर्षे वयोमर्यादा आणि उत्पादन शुल्क विभागाचा परवाना बंधनकारक आहे. हा परवाना एक दिवस ( रु.5), एक वर्ष (रु.100) किंवा आजीवन (रु.1000) अशा कालावधीसाठी मिळतो. ऑनलाइन अर्जासाठी आधारकार्ड आवश्यक असून, डॉक्टरांच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. तरीही जिल्ह्यात आजीवन परवाना घेतलेल्यांची संख्या अवघी हजाराच्या आसपास आहे, तर वार्षिक परवाना घेणाऱ्यांची संख्या शंभरच्या आत आहे.

याउलट, जिल्ह्यातील दारू दुकानांवर विशेषत: शनिवार-रविवार, सण-उत्सवाच्या काळात प्रचंड गर्दी उसळते. चिखलदरा-मेळघाट भागात तर पर्यटकांच्या ओघामुळे परतवाडा व परिसरातील दुकानांवर तोबा गर्दी पाहायला मिळते. कायद्यानुसार ग्राहकाकडे परवाना आहे का नाही, हे तपासण्याची जबाबदारी विक्रेत्याची आहे. मात्र प्रत्यक्षात एकाही ग्राहकाकडून परवाना विचारला जात नाही. विक्रेते मात्र विक्रीचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवत असल्याचे सांगितले जाते. उत्पादन शुल्क विभागाच्या या ढिलाईमुळे परवाना प्रणाली केवळ कागदोपत्रीच राहिली आहे, तर प्रत्यक्षात परवान्याविना मद्यविक्री सर्रास सुरू असल्याने कायद्याचा बोजवारा उडाल्याची टीका होत आहे.

# एक्साईजमधील लाचखोर अधिकारी, वाहनचालक अटकेत

## अवैध दारू विक्री सुरू ठेवण्यासाठी घेतली 15 हजारांची लाच

महासागर प्रतिनिधी

अमरावती, ( दि. 14 )- अवैध दारू विक्री सुरू ठेवण्यासाठी आणि जप्त वाहन सोडवून देण्यासाठी 15 हजार रुपये मासिक लाच स्वीकारणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकातील निरीक्षक आणि वाहनचालकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहाथ पकडले. अटक झालेल्या आरोपींची नावे निरीक्षक सूरज रतनसिंग दाबेराव (50, काँग्रेस नगर, सिग्नेचर सोसायटी, अमरावती) आणि वाहनचालक संजय झिमाजी देहाडे (57, एमआर कॉलनी, भांदकर रेसिडेन्सी, अमरावती) अशी आहेत.




तक्रारदाराचा अमरावतीत किराणा दुकानासोबत अवैध दारू विक्रीचा व्यवसाय आहे. 16 जुलै रोजी राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाने त्यांच्यावर कारवाई करत चारचाकी वाहन (एमएच 29 एआर 1036) जप्त केले होते. हे वाहन सोडवून देणे आणि दारूचा व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी आरोपींनी 15 हजार रुपये मासिक लाचेची मागणी केली होती.

तक्रारीनंतर गुरुवारी एसीबी पथकाने सापळा रचला. कारवाईदरम्यान निरीक्षक दाबेराव यांनी स्वत: वाहन सोडवून देणे व व्यवसाय सुरू ठेवण्याच्या बदल्यात 15 हजार रुपये मागितले. त्यांच्या सांगण्यावरून वाहनचालक देहाडे यांनी पंचांच्या उपस्थितीत रक्कम स्वीकारताच एसीबीने त्यांना रंगेहाथ पकडले.

दोन्ही आरोपींना जागेवरच ताब्यात घेऊन राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलिस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस उपअधीक्षक सुनील किनगे, पोलिस निरीक्षक चित्रा मेसरे, सुजाता बनसोड व पथकाने केली.

# शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन

अमरावती, ( दि.14 )- भारतीय स्वातंत्र्याच्या 78 व्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजवंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. 15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 9.05 वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

सोहळ्यात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या नागरिकांनी राष्ट्रीय किंवा समारंभीय पोषाखात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने नागरिकांनी कोणतीही बॅग सोबत आणू नये, तसेच समारंभ सुरू होण्यापूर्वी 20 मिनिटे आधी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहावे.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती**
**e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No. 0721-2550538**

**ई-निविदा सुचना क्र. 20 सन 2025-2026 ( दुसरी वेळ )**

कामाचे नांव: अमराती पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत तपोवन येथील 61 MLD व 95 MLD अभियंता, सुपरवायझर, पंपचालक, फिल्टर ऑपरेटर, केमिस्ट व मजदुराची सेवा पुरविणे बाबतचे एकुण 2 कामाच्या निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी-1 पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कामा संबंधीचा सविस्तर तपशिल दिनांक 18/08/2025 ला 12.00 वाजे पासुन विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्ड व महाराष्ट्र शासनाच्या ई टेंडर संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/nicgep/app वर उपलब्ध राहील.

विमाका/अम./जाही./409/2025-2026

( बिधेक सोळंके )
कार्यकारी अभियंता



# कर्ज व आजाराने त्रस्त शेतकऱ्याची आत्महत्या

## दाभा येथे विहिरीत उडी

महासागर प्रतिनिधी

अमरावती, ( दि. 13 ) नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा येथील एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा व हृदयविकाराच्या आजाराने कंटाळून स्वत:च्या शेतातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. ही घटना 13 ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास घडली. मृत शेतकऱ्याचे नाव गुलाबराव लक्ष्मणराव चौधरी असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुलाबराव चौधरी यांच्याकडे शेती असून त्या शेतीवर त्यांनी कर्ज घेतले होते. दरम्यान, त्यांना हृदयात ब्लॉकेजची समस्या निर्माण झाली होती. कर्जाचा बोजा व प्रकृतीची गंभीर समस्या यामुळे ते गेल्या काही दिवसांपासून चिंतेत होते.

13 ऑगस्ट रोजी पहाटे ते सायकलने शेताकडे गेले. अशोक बारस्कर यांच्या शेतातील विहिरीत त्यांनी उडी मारली. सकाळी मुलगा सुधीर झोपेतून उठला असता वडील घरात नसल्याचे त्याला दिसले. शोधाशोध केली असता शेजारच्या महिलेने त्यांना पहाटे सायकलने शेतात जाताना पाहिल्याचे सांगितले. शेतात गेल्यावर सायकल विहिरीजवळ पडलेली दिसली. विहिरीत डोकावून पाहिले असता गुलाबराव यांचा मृतदेह पाण्यात तरंगताना दिसला.

घटनेची माहिती बडनेरा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन पंचनामा करून मृतदेह बाहेर काढला. त्यांच्या खिशात मिळालेल्या सुसाईड नोटमध्ये कर्जबाजारीपणा व हृदयातील ब्लॉकेजच्या त्रासामुळे आत्महत्या केल्याचे नमूद केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी अमरावतीत वाहतूक व्यवस्थेत बदल

महासागर प्रतिनिधी

अमरावती,( दि.14 ) - शहरात शुक्रवार, 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या 78व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांदरम्यान वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळकरी मुले, पालक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ होत असल्याने अपघात, कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या अडचणी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबई पोलिस कायदा 1951 चे कलम 33 (1)(ब) आणि मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 115 अन्वये, 15 ऑगस्ट रोजी रात्री 12 वाजेपर्यंत शहरात सर्व प्रकारच्या हलक्या व जड मालवाहू वाहनांच्या प्रवेशास बंदी राहील.

### अशी असेल प्रवेश बंदी

गाडगेनगर समाधीपासून जिल्हा स्टेडियम उड्डाणपुलापर्यंत, इर्विन चौक ते राजापेठ पोलिस स्टेशन, कुथे हॉस्पिटल ते नंदा मार्केट, कुशल ऑटोकडे जाणारा उड्डाणपूल या मार्गांवर सकाळी 6 ते रात्री 12 वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर लैंगिक अत्याचार

महासागर प्रतिनिधी

अमरावती, ( दि. 14 ) अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 42 वर्षीय महिलेची फसवणूक करून तिच्यावर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार करण्यात आला. एवढेच नव्हे, तर महिलेची 7 लाख 30 हजार रुपयांची फसवणूक करून आरोपी फरार झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, फेब्रुवारी 2024 मध्ये पीडितेची आरोपी देवराव देवसिंग साबळे (34, रा. धोणी, पालोदी, ता. मनोरा, जि. वाशिम) याच्याशी सोशल मीडियावर ओळख झाली. ओळख वाढत गेल्यानंतर आरोपीने लग्नाचे आश्वासन देत पीडितेशी शारीरिक संबंध ठेवले. त्याच्यावर विश्वास ठेवून महिलेने त्याला 6 लाख 50 हजार रुपये रोख, सोन्या-चांदीचे दागिने, क्रेडिट कार्डद्वारे 80 हजार रुपये आणि मोटारसायकल दिली. यानंतर आरोपी सर्व मालमत्ता घेऊन पसार झाला. त्याने पीडितेशी संपर्क तोडला, शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकीही दिली. ही घटना 24 फेब्रुवारी 2024 ते 23 जून 2025 दरम्यान घडली. अखेर पीडितेने 13 ऑगस्ट रोजी अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी देवराव साबळेविरुद्ध बलात्कार, फसवणूक आणि धमकावणे या कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शहर पोलिसांची एमडीविरोधी मोहीम वेगात

## 8 प्रकरणे उघड, 33 आरोपी अटक, 92 लाखांचा मुद्देमाल जप्त




महासागर प्रतिनिधी

अमरावती,( दि.14 ) - तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या मेफेड्रोन (एमडी) सारख्या घातक अमली पदार्थांच्या तस्करी व विक्रीवर शहर पोलिसांनी यंदा विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली सलग छापे, सर्च ऑपरेशन आणि गुप्त कारवायांमधून मोठा साठा हेरून जप्त करण्यात आला.

या वर्षी 1 जानेवारी ते 13 ऑगस्ट 2025 दरम्यान एमडीच्या 8 प्रकरणांचा पर्दाफाश करताना पोलिसांनी 33 आरोपींना अटक केली.

या कारवाईत 408 ग्रॅम एमडी जप्त झाला असून त्याची बाजारभावानुसार किंमत रु.31,82,050 इतकी आहे. याच कालावधीत गांजाच्या 8 प्रकरणांत 71 किलो माल (रु.18,28,200 किंमतीचा), हुक्का व ई-सिगारेटच्या 3 प्रकरणांत रु.5,54,450 किंमतीचा माल, गुटख्याच्या 11 प्रकरणांत रु.39,62,068 किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच बार/पब/रूफटॉपवरील एका कारवाईत 6 जणांवर कारवाई, कोटपा अंतर्गत 92 कारवाया, तर गांजा/एमडी सेवनार्थी 30 जणांना पकडण्यात आले. एकूण जप्त मालाची किंमत तब्बल रु.92,26,768 इतकी आहे.

### 13 ते 17 ऑगस्ट 'ऑपरेशन वाइप आऊट


पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी स्पष्ट केले की, अमली पदार्थ विक्रेत्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. तसेच नागरिकांना आवाहन केले की, परिसरात अशा प्रकारच्या संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना कळवावे, जेणेकरून समाजातील तरुणांना या घातक व्यसनापासून वाचवता येईल. अमरावती शहरातील महाविद्यालयीन युवक, व्यापारी वर्ग व अल्पवयीन पिढीत वाढत्या गांजा व एमडीच्या सेवनाला आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या संकल्पनेतून 13 ते 17 ऑगस्टदरम्यान 'ऑपरेशन वाइप आऊट' मोहीम राबविली जाणार असून, अंमलीपदार्थांच्या ताबा, वाहतूक, विक्री व सेवनावर कठोर कारवाईसोबत जनजागृतीही केली जाणार आहे.

### पाटीपुरा परिसरात छापा

मंगळवारी रात्री नागपुरी गेट पोलिसांनी पाटीपुरा परिसरात गुप्त माहितीच्या आधारे धाड टाकून 60.51 ग्रॅम एमडी ( ?4,36,830 किंमतीचा) जप्त केला. या प्रकरणात सईद खान शरीफ खान (45, रा. पाटीपुरा) याला अटक करण्यात आली. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक जितेंद्र भार्गव यांच्या पथकाने, निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

### ड्रग्ज नेटवर्कवर टप्प्याटप्प्याने प्रहार


पोलिसांनी ड्रग सप्लाय चेन मोडण्यासाठी गुप्त धाडी व सर्च ऑपरेशनचा वापर करून सराईत गुन्हेगारांना जेरबंद केले आहे. गुप्त माहिती यंत्रणा व खबऱ्यांच्या मदतीने खरेदी-विक्रीच्या संपूर्ण जाळ्यावर लक्ष ठेवण्यात आले असून, प्रत्येक पायरीवर कारवाई सुरू आहे.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेतली. द्रकश्राव्य माध्यमा द्वारे प्रात्यक्षिक दाखवत त्यांनी भाजपच्या विजयाची अक्षरशः लक्तर मांडली. त्यांनी महत्त्वाचे पाच प्रश्न उभे केले. पण मूळ मुद्द्याला बगल देण्यासाठी भलतेच पिल्लू सोडून दिले आणि देशातील अनेकांना कामाला लावले. मूळ मुद्द्याला कोणीही हात घालायला तयार नाही. मतदार यादीतील एकच उदाहरण डोळ्यासमोर घ्यावे लागेल, ते म्हणजे एकाच बापाची ४२ पोरं, वय सगळ्यांचे २९ ते ६७ च्या आसपास आहेत. अनेक पोरं एकाच वर्षी जन्माला घालून 'त्या' पोरांचा बाप राम कमलदासने विश्वविक्रम केला आहे.? एका वर्षात चार पाच पोरं जन्माला घातली. खरचं राम कमलदास खूपच पराक्रमी निघाला. निवडणूक आयोगाचे कपडे इतक्या ठिकाणी फाटले आहेत की, त्यांना त्यांच भोंगळेपणा लपवता येत नाहीये आणि आता हे मोक्कार फाटतच जाणार आहे. मतदार यादीत घोळ करून मत चोरी करणारा इलेक्शन कमिशनचा प्रमुख नुरुल हुडा याला रिटायर झाल्यानंतर अटक झाली, तेव्हा बांग्लादेशी जनतेनं त्याला गाठून चप्पलचा प्रसाद दिला होता. आपली मतं चोरीला जाणं यापेक्षा आपला मोठा अपमान नाही. अन्यायाची परिसीमा आहे ही. कधी ना कधी त्याचा उद्रेक होतोच. भारतात भविष्यात असे काही घडल्यास नवल वाटायला नको. निवडणुकीतील मत चोरी पैकी ज्या काही घडामोडी या देशात घडल्या, त्या देखील न्याहाळणे गरजेचे आहे. विशेषतः लोकसभेत त्याचा पाया कसा रचला गेला, याकडे जनतेने बारकाईने पाहिले पाहिजे. कारण संसदेत नसलेले, कॅन्टीनमध्ये बसलेले, संसदीय समितीच्या मिटिंगमध्ये बसलेले असे मिळून दीडशे खासदार फटक्यात निलंबित करून घाईघाईने मंजूर केलेली विधेयक आठवतात का? त्यातलं सगळ्यात महत्वाच विधेयक काय होतं? निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांच्या नेमणुकीच्या समितीतून सरन्यायाधीश हटवून केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करणे. बर हा कायदा लोकसभेत मंजूर झाल्यावर स्वतःहून आपल्या अधिकारांत कपात झाली म्हणून विरोध करायचे दूरच, उलट त्याच्या विरोधात लोक कोर्टात गेल्यावर तत्कालीन सरन्यायाधीश गप्प बसले. मतदारांची संख्या, याद्या, नाव यात घोळ घालायला पुरेसा वेळ मिळावा, प्रचार फेऱ्या होऊ द्याव्यात आणि मग निवडणुका जाहीर कराव्यात यासाठी सरकारच्या हातातली कळसूत्री बाहुली आयुक्त असावी म्हणून दीडशे खासदार निलंबित करून कायदे मंजूर करून घेतले. ज्यांची औकात नगरसेवक पदावर निवडून येण्याची नाही, असले गुळाचे गणपती संसदेत बसवून हात वर करायला नेमलेत. या चोरीत सगळे सामील आहेत. निवडणूक आयोग, काही माध्यमांचे मालक आणि दलाल, मसुरीत 'विशेष ट्रेनिंग' घेतलेले व कालांतराने 'गब्बर' झालेले सरकारी अधिकारी, सगळे सत्तेचे लाभार्थी या चोरीत सहभागी होऊन लोकशाहीचा मुडदा पाडत आहेत.




## राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला दाखविला

# 'हा सूर्य हा जयद्रथ'




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

संविधानिक मार्गाने केले जात असलेले लोकशाहीच्या रक्षणासाठीचे आंदोलन, त्यामागची पार्श्वभूमी, तळमळ, निवडणूक आयोगाच्या माध्यमातून लोकशाहीची दिवसाढवळ्या होत असलेली हत्या, निवडणूक आयोगाचे वाढते निर्ढावलेपण याबाबत चिंता आपण का म्हणून करावी?

आज देशाची जी काही अवस्था किंवा दुर्दशा झालेली आहे त्यात सर्वात मोठा वाटा हा आपलाच आहे हे या देशातील जनतेला आता कळून चुकले आहे. एक सभ्य आणि सुसंकृत असलेला आपला देश जागतिक पातळीवर आपले स्वतःचे अस्तित्व आपल्या स्वसामर्थ्याच्या बळावर निर्माण करून ताठ मानेने जगणारा आपला देश आज रसातळाला का निघाला?

गेल्या सत्तर वर्षात जागतिक पातळीवर जितकी नालस्ती आपली झाली नसेल तितकी गेल्या दहा वर्षात आपल्या पदरी पडली आहे ती कुणाच्या कृपेने? देशातील अनेक राज्यांपैकी फक्त महाराष्ट्र डोळ्यासमोर घेतला, तरी देशात काय चालले आहे याचा अंदाज सहज येईल. परंतु यातून आपल्याला बाहेर पडता येईल का? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

निवडणूक आयोगाने ज्या पद्धतीने कारभार केला तो देशातील जनतेला नक्कीच पसंत पडलेला नाही. त्यातील काही भाग अतिशय म्हणून प्रसारित झाला असेल याबद्दल दुमत नाही. पण जनतेच्या मनात 'दाल में कुछ काला है' हा संदेश पोहोचला आहे. कारण या सर्व घडामोडी घडण्यापूर्वी संसदेतील घडामोडींचा देखील अभ्यास केला पाहिजे. मागे एकदा अनेक खासदार निलंबित करून सरकारने त्याचा पाया रचला होता.

त्यावेळी संसदेत नसलेले, कॅन्टीनमध्ये बसलेले, संसदीय समितीच्या मिटिंगमध्ये बसलेले असे मिळून दीडशे खासदार फटक्यात निलंबित करून घाईघाईने मंजूर केलेली विधेयक आठवतात का? त्यातले सगळ्यात महत्वाच विधेयक काय होतं? निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांच्या नेमणुकीच्या समितीतून सरन्यायाधीश हटवून केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करणे. तीन सदस्य

पीएम, एलओपी, मंत्री तर मग बहुमत कुणाचं ? बरं हा कायदा लोकसभेत मंजूर झाल्यावर स्वतःहून आपल्या अधिकारांत कपात झाली म्हणून विरोध करायचा लांब, त्याच्या विरोधात लोक कोर्टात गेल्यावर तत्कालीन सरन्यायाधीश गप्प बसले.

मतदारांची संख्या, याद्या, नाव यात घोळ घालायला पुरेसा वेळ मिळावा. प्रचार फेऱ्या होऊ द्याव्यात आणि मग निवडणुका जाहीर कराव्यात यासाठी सरकारच्या हातातली कळसूत्री बाहुली आयुक्त असावी म्हणून दीडशे खासदार निलंबित करून कायदे मंजूर करून घेतले. आता तर खुलेआमपणे असं म्हटलं जात आहे की, ज्यांची औकात नगरसेवक पदावर निवडून येण्याची नाही, असले गुळाचे गणपती संसदेत बसवून हात वर करायला नेमलेत.

या चोरीत सगळे सामील आहेत. निवडणूक आयोग, माध्यमांचे मालक आणि दलाल, मसुरीचे पेढे खाऊन फुगलेले सरकारी अधिकारी, सगळे सत्तेचे लाभार्थी या चोरीत सहभागी होऊन लोकशाहीचा मुडदा पाडून देशाला लुटायला बोडक्यावर बसलेले आहेत.

यांची सत्ता चोरीची आहे, हा जनादेश नाही हे समजायला 'पप्पू' म्हणून हिणविला गेलेला एक लोकप्रतिनिधी पुढे आला आणि त्याने संपूर्ण देश हादरून सोडला. निवडणूक आयोगाबद्दल जनमानसात काय चर्चा सुरू आहे, हे एकदा त्यांना कळाले पाहिजे. उदाहरण म्हणून सांगितले जाते की, आता सरकारच्या ताब्यात असलेला डेटा कोणाचा ? तर निवडणूक आयोगाचा, त्यातील मतांची चोरी दाखवून कोणी दिली? राहुल गांधींनी. आयोग काय म्हणतो? तुम्ही प्रतिज्ञापत्र द्या. म्हणजेच गर्दीत पाकीट मारलं जातं. लक्षात आल्यावर माणूस बोंब मारतो की प्रतिज्ञापत्र करतो? बाईचं मंगळसूत्र मारून चोर पळतात. बाई आरडाओरडा करते. लोकं गोळा होतात. लोकं काय करतात? बाईकडे प्रतिज्ञापत्र मागतात? की चोरांच्या मागावर पळतात?

निवडणूक आयोगाच्या डेटाची चोरी पकडून देणाऱ्याकडेच प्रतिज्ञापत्र मागितलं जातंय. बरं उद्या कोर्टात गेल्यावर कोर्ट विचारणार की, तू सच्चा भारतीय आहेस की कच्चा भारतीय आहेस. राजकारणात राहुल गांधींपेक्षा मोदी प्रचंड हुशार व परिपक्व आहेत हे एक वेळ मान्य करू. पण ज्याची आजी देशासाठी शहीद झाली, ज्याचे वडील हुतात्मा झाले, त्याला सच्चा भारतीय आहेस का विचारलं जातंय. खरंच अमृतकाळ सुरू झाला आहे का?

एक लक्षात घेतले पाहीजे की, बांगलादेशात निवडणूक आयुक्ताला लोकांनी रस्त्यावर कुटला होता. म्हणूनच जनतेत आता म्हटले जात आहे की, चुनाव आयोग मधला 'व' कायमचा डिलीट करावा व चुना लावणारा 'चुना' आयोग शोभून दिसेल. निवडणूक आयोगाला कोणावर कारवाई करायची, कोणाला खरं म्हणायचं, कुणाला खोटं म्हणायचं याचे निर्णय राजकीय पातळीवर घेत असेल, तर या देशाचे भवितव्य खूप कठीण राहील असे वाटते.

कारण निवडणूक आयोगाने जर जुनी प्रतिज्ञापत्रं उघडली, तर पहिल्याच पानावर मोदी दिसतील. त्यांच्या तीन प्रकारच्या शपथपत्रांमध्ये शपथपूर्वक सांगितलं आहे की, 'मी अविवाहित आहे' आणि काही वर्षांनी निवडणूक आयोगालाच कळवलं 'हो, माझं लग्न झालंय'. मग आधीची प्रतिज्ञापत्रं काय होती? आधी खोटं, की नंतरचं खरं? की दोन्ही वेळा राजकारणच खरं?

दुसऱ्या पानावर स्मृती इराणी. पहिल्या निवडणुकीत ग्रॅज्युएट, पुढच्या निवडणुकीत बारावी पास. असा रिव्हर्स एज्युकेशनचा प्रकार फक्त भारतीय राजकारणातच शक्य आहे नाही का? ही फक्त झलक आहे. अशी सत्य वचनं असलेली बरीच प्रतिज्ञापत्रं सरकारी फाईलमध्ये धूळ खात पडली आहेत. आणि कारवाई? त्या फाईलवरची पिनही आजवर निघालेला नाही.

मग प्रश्न असा पडतो की, निवडणूक आयोगाने आजवर अशा खोट्या प्रतिज्ञापत्रांवर काय कारवाई केली? सत्तेत असलेल्यांवर कधी गुन्हा दाखल झाला का? कधी कुणाला अपात्र ठरवलं का? तर उत्तर आहे शून्य.

निवडणूक आयोग चोर, घोटाळेबाज, सत्ताधाऱ्यांचा गुलाम आहे, यावर आपसूकच विश्वास बसतो की नाही? राहुल गांधी निवडणूक आयोगाला मतदारांच्या याद्या डिजिटल स्वरूपात मागतात. निवडणूक आयोग देत नाही. उलट निवडणूक आयोग आपली वेबसाईट बंद करते.

देशातील अनेक पुल कोसळत आहेत, रस्त्यांना भगदाडं पडत आहेत, विमानतळांचे छत तुटून पडत आहेत, रेल्वे गळत आहेत. निवडणुक आयोगाच्या गैरकारभाराचे धडधडीत पुरावे राहुल गांधींनी देशाच्या जनतेसमोर ठेवलेत. सत्य सर्वांसमोर आहे.

आता आपण ठरवायचंय सत्याच्या पाठीशी ठामपणे उभं राहून लोकशाहीसाठीच्या या युद्धात उतरायचं की लोकशाहीवर मतचोरीतून झालेला हा हल्ला आपला मतदानाचा अधिकार काढून घेईपर्यंत बघत राहायचा.

आज जगात भारत एकाकी पडलाय, सर्व शेजारी विरोधात गेलेत, एकेकाळचा दक्षिण आशियाचा दादा आता विकलांग व रोगट झालाय आणि आर्थिकदृष्ट्या सर्वांत कमजोर होतोय. फसवाफसवीने सत्तेवर आलेल्या नेत्यांवर जग विश्वास ठेवत नाही. त्यामुळे व्यापारी करारांमध्ये देशाचा खुप मोठा तोटा होण्याची शक्यता आहे.

अशा कठीण परिस्थितीत विश्वासु आणि उच्चशिक्षित नेतृत्वाची देशाला गरज आहे, नाहीतर देश अपयशाच्या गर्तेत जावू शकतो आणि या एआयच्या जमान्यात भारत पुन्हा स्पर्धेत सुद्धा उतरू शकणार नाही.

### मुख्यमंत्री फडणविस तुम्ही सुध्दा?

महाराष्ट्रातील राजकारण खालच्या पातळीवर गेले आहे असे आपण म्हणतो, तेव्हा बहुधा शिंदे सेनेच्या कोणत्या तरी आमदारांनी काही तरी तारे तोडलेले असतात किंवा कोणी तरी मारामाऱ्या केलेल्या असतात. पण आता तर चक्क राज्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या व्यक्तीनेही तारतम्य सोडून बोलायला सुरवात केली आहे. राहुल गांधीच्या पत्रकार परिषदेत ते मतांच्या चोरीबद्दल बोलले. त्याबद्दल बोलतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राहुल यांच्या डोक्यातील चिप चोरीला गेलेली असून त्यांची हार्ड डिस्क करप्ट झाली आहे. ज्या व्यक्तीला आपण राजकारणातील थोडाफार सुसंस्कृत माणूस समजायचो त्याने अशी भाषा आणि ती ही देशाच्या विरोधी पक्ष नेत्याबद्दल वापरावी हे धक्कादायक आहे. तसेही भाजप अकरा वर्षांपूर्वी सत्तेत आल्यापासून विरोधी पक्षांच्याबद्दल त्यांच्या अनेक नेत्यांची भाषा तुच्छतापूर्ण असते.

सत्तेचा माज त्यांच्या अनेक नेत्यांच्या बोलण्यातून टपकत असतो. त्यातही त्यांच्यातील स्वतःला श्रेष्ठ, बुद्धिमान आणि सर्वज्ञ समजणारे लोक ही एक वेगळीच वर्गवारी आहे.

त्यांच्या बोलण्यातच एक आपण जन्मजात श्रेष्ठ आहोत असा दर्प जाणवत असतो. टीव्हीवर डिबेट्स मध्ये किंवा वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तर देताना ते ज्या प्रकारे कुत्सित हसत असतात त्याचे जरा निरीक्षण केल्यावर तसे जाणवते. पण जेव्हा राज्याचा मुख्यमंत्री देशाच्या विरोधी पक्षनेत्याबद्दल अशी भाषा वापरतो तेव्हा ते अतिशय चुकीचे आहे. जगातल्या सगळ्या शहाणपणाचा मक्ता आपल्यालाच दिलाय आणि बाकी सगळे मूर्ख आहेत अशी ही मनोवृत्ती दिसते. तसेही राहुल गांधींनी उघड केलेले मुद्दे हे निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवर आणि कागदपत्रांवरच आधारित असल्याने त्याला उत्तर देणे यांना सगळ्यांनाच कठीण जात आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रिया जर पाहिल्या तर त्या मुद्दे सोडून निव्वळ वैयक्तिक टीका किंवा असंबद्ध शेरे या प्रकारच्या आहेत. खुद्द निवडणुका आयोग बोगस मतदारांच्या नावासकट आणि विविध बूथसकट माहिती देऊनही स्वतः काही करायला तयार नाही. उलट ते राहुल यांनाच प्रतिज्ञापत्र द्यायला सांगत आहे.

सगळी माहिती आयेगाकडे आहे, अधिकारी, कर्मचारी त्यांचेच आहेत, संपूर्ण यंत्रणा निवडणुकीच्या वेळी तेच राबवतात आणि चौकशी करायला दुसऱ्यांना सांगता? मतदार याद्या सॉफ्ट कॉपीत न देता त्यांच्या प्रती देणे हा काय प्रकार आहे? आयोग कोणत्या युगात वावरतोय? ज्याला संगणकाचे प्राथमिक ज्ञान आहे त्याला हे असे का केले जात आहे ते लगेच समजेल. सॉफ्ट कॉपीत मिळाली तर कमांड देऊन कोणतीही माहिती लगेच शोधता येते, माहितीचे पृथक्करण करता येते, किंवा माहितीची समोरासमोर तुलना करता येते. हे टाळायचे असेल तर माहितीची प्रिंट काढून द्यायची. बसा हजारो पाने शोधत. त्यामुळेच फक्त एका मतदारसंघाची माहिती तपासायला कॉंग्रेसला सहा महिने लागले. सध्या तरी विरोधी पक्षांनी फक्त या निवडणुकीची माहिती सॉफ्ट स्वरूपात मिळाल्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि ही माहिती नष्ट करण्यात येणार नाही हे पाहिले पाहिजे. लोकशाही नष्ट करायला लष्करशाहीच आणावी लागते असे नाही. लोकशाहीच्या बुरख्याखाली सगळ्या संस्था बटीक बनवूनही हुकूमशाही आणता येते. बांगलादेशामध्ये शेख हसीना यांनी ते एक दशकाहूनही जास्त काळ हुकुमशहा होऊन दाखवले होतेच.

# शेतकऱ्यांची कर्ज मुक्ती कधी?

भारत हा कृषिप्रधान देश असून आपल्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६०% लोक कृषी व्यवसायावर अवलंबून आहेत. परंतु शेतीत अनेक अडचणी, निसर्गाचं लहरीपणा, अपुरा पाऊस, महाग शेतीसामग्री, बाजारातील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडतात. परिणामी, सरकार वेळोवेळी कर्जमाफीसारखी धोरणं जाहीर करत असते. कर्जमाफी ही एक तात्पुरती मदत असली, तरी तिचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिणाम दूरगामी असतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आमदार बच्चू कडू हे शेतकरीहितासाठी नेहमी आवाज उठवणारे नेते म्हणून ओळखले जातात.

**कर्जमाफी म्हणजे काय?**

कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा सहकारी संस्थांकडून घेतलेले कर्ज सरकारकडून माफ करणे. ही योजना प्रामुख्याने अल्पभूधारक व गरजू शेतकऱ्यांसाठी असते. यामध्ये कर्जाची परतफेड करावी लागत नाही. अशा योजनांचा उद्देश शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे, त्यांना नव्याने उभं राहण्यासाठी मदत करणे आणि शेतीला चालना देणे असतो.

**कर्जमाफीची गरज का भासते?**

निसर्गाची लहरी वृत्तीः दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, हमीभाव यामुळे पीक नुकसान होते.

**उत्पन्नातील अनिश्चितताः** बाजारात भाव घसरल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते.

**उच्च उत्पादन खर्च** : बियाणं, खते, औषधं महाग असल्याने खर्च वाढतो.

**कर्जाचा बोजा** : अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घेतात.

**शासकीय यंत्रणेची कुचकामी कार्यपद्धती** : वेळेवर अनुदान, सल्ला मिळत नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र स्वतंत्र्य काळापासून ज्यांचा लढा नेहमी सुरूच आहे ते मात्र शेतकरी कर्जापासून कधी स्वतंत्र मिळेल हा कडे वाट पाहत आहे. शेवटी कर्ज काढण्याची त्यांच्यावर परिस्थिती येऊ नये यासाठी सरकारने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

निवडणुका आले की कोणतेही राजकारणी असो की ते शेतकरी यांना कर्जमाफी करणार असल्याच्या भुलथापा देतात मात्र आपला भोळा भाबडा शेतकरी त्या भूलथापांना बळी पडतो आणि याचाच फायदा हा राजकारणी लोकं नेहमी निवडणुकीत घेत असल्याचे पाहायला मिळते. तर सत्ता आली की त्यांचे वेगवेगळे कारणे वेळ काढू पणा आपल्याला पाहायला मिळते . त्यामुळे आता या स्वतंत्र दिनी तरी सरकार शेतकऱ्याला कर्जापासून मुक्त देईल असे आशा शेतकऱ्याला आहे.

**सरकारची भूमिका**

राज्य सरकारांनी गेल्या काही दशकांत वेळोवेळी कर्जमाफी योजना जाहीर केल्या आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात २००८ साली 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना', २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारची कर्जमाफी, तर २०१९ नंतर उद्धव ठाकरे सरकारची 'महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना' अशा विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या. परंतु या योजना प्रभावीपणे लागू झाल्या का, यावर प्रश्नचिन्ह राहिले आहे. अनेक वेळा कर्जमाफीचा लाभ गरजूंना न मिळता राजकीयदृष्ट्या प्रभावशाली लोकांनी घेतल्याची उदाहरणं आहेत.

बच्चू कडू हे महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यातील अचलपूरचे आमदार असून प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आहेत. त्यांची प्रतिमा एक ज्वलंत, बेधडक आणि लोकाभिमुख नेत्याची आहे. त्यांनी अनेक वेळा विधानसभेत व बाहेर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतली आहे.

**शेतकरीहितासाठीचे प्रयत्न** :

सरकारच्या विरोधात आवाज : सत्तेत असूनही त्यांनी आपल्या सरकारविरुद्ध शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उघडपणे टीका केली आहे.

प्रत्यक्ष शेतात भेटी : दुष्काळग्रस्त भागात जाऊन शेतकऱ्यांची दुःख ऐकली आहेत.

कर्जमाफीची मागणी : ते सातत्याने मागणी करत असतात की खरीप हंगामातील नुकसान झाले असल्यास तात्काळ कर्जमाफ करावे.

लोकआंदोलन : गरज पडल्यास त्यांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

सौ. आश्विनी डकरे
अमरावती.
९९७५८४४६३८

तात्पुरता उपाय : कर्जमाफी ही शेतकऱ्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय नाही.

कर्जसंस्कृतीचा बिघाड : पुन्हा कर्ज घेऊन परतफेड न करण्याची प्रवृत्ती वाढते.

अकार्यक्षम अंमलबजावणीः शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचत नाहीत.

बँकिंग यंत्रणेवर परिणाम : सततच्या कर्जमाफीमुळे बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यास अनिच्छुक होतात.

**पर्यायी उपाय काय असू शकतात?**

सिंचनाच्या सुविधा वाढवणे. पीकविमा योजना प्रभावी करणे. शेतीमालाला हमीभाव देणे आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणे. शेतकऱ्यांसाठी आर्थिक साक्षरता अभियान. थेट बँक खात्यावर अनुदान.

कर्जमाफी ही एक वेदनादायक पण गरजेची पावले आहेत. सरकारने शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन उन्नतीसाठी ठोस धोरणांची गरज आहे. अशा वेळी बच्चू कडूं सारख्या लोकप्रतिनिधींनी केवळ, शासन यंत्रणेवर दबाव टाकून शेतकऱ्यांच्या खऱ्या अडचणींवर उपाय शोधणे गरजेचे आहे. त्यांची भूमिका ही जनतेच्या भावनांशी जोडलेली असून, ते हे सुनिश्चित करत आहेत की शेतकऱ्यांचा आवाज विधानसभेत पोहोचतो. मात्र ते आता विधानसभा नाहीत त्यामुळे ते जनतेत जाऊन त्यांच्या समस्या या शासन दरबारी पोचवत आहे.

शेवटी, शेतकरी जगला तरच देश जगेल, हे लक्षात घेऊन राजकारण बाजूला ठेवून सरकार, प्रशासन व जनतेने एकत्र येऊन काम केल्यासच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावू शकते.

■ ■ (क्रमशः) ■ ■

# अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त लेख..

भारताला पुण्यभूमी असे म्हणतात,तर महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेल्या अलंकापुरीला अर्थात आजच्या आळंदीला संतांनी पुण्यभूमी म्हटले आहे.

*'अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र'*
*तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र'*
*तया आठवितां महा पुण्यराशी'*
*नमस्कार माझा ज्ञानेश्वरासी'*

असा जयघोष करीत माऊली ज्ञानेश्वरांच्या हरिपाठास सुरुवात करून वंदन करतात.आळंदी हे महाराष्ट्राचे धार्मिक भावभावनांचे केंद्रबिंदू आहे. आळंदी श्रद्धा-भक्ती- शक्तीचे ऊर्जा स्त्रोत होय. आळंदी नाव स्मरताच ज्ञानेश्वर माऊलींचे वासल्य प्रेमाने ओसांडून जात असलेली दयाघन महाकैवल्य तेजाची संजीवन समाधी एकदम डोळ्यांपुढे उभी राहते. वारकरी संप्रदायात श्रीक्षेत्र पंढरपूर नंतर आळंदीचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

*'यात्रे अलंकापुरा येती' ते आवडती विठ्ठला'*
*पांडुरंगी प्रसन्नपणे' केले देणे ज्ञाना'*
*भू वैकुंठ पंढरपूर' त्याहुनी थोर महिमा या '*
*निळा म्हणे जाणूनि संत '*
*येती धांवत प्रतिवर्षी''*



अशा शब्दात संत निळोबारायांनी आळंदी क्षेत्राचा महिमा गायला आहे. जे वैष्णवजन अलंकापुराला श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी दर्शनासाठी आणि यात्रेसाठी येतात ते विठ्ठलाला प्रिय आहेत. विठ्ठलाच्या कृपा प्रसादानेच माऊलींना ज्ञानाचे दान मिळाले आहे. ज्याप्रमाणे संतांनी पंढरपूरला भूवैकुंठ मानून महिमा गायला आहे, त्याहूनी थोर महिमा आळंदीचा आहे.असे संत निळोबाराय अभंगातून म्हणतात.हे संतांना माहीत आहे, म्हणून वैष्णव दरवर्षी आळंदीला मोठ्या श्रध्देने येतात व आजही शेकडो वर्षाची परंपरा कायमचं आहे.

आळंदी हे तीर्थक्षेत्र निव्वळ संततीर्थ नसून देव तीर्थही आहे.आळंदीला पौराणिकदृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. कृतयुगात आनंदवन, त्रेतायुगात वरुण क्षेत्र,द्वापारयुगात कपिल क्षेत्र,कलियुगात अलंकापुरी (आळंदी) तसेच या व्यतिरिक्त शिवतीर्थ, सिद्धक्षेत्र, अलंकावती, कर्णिका, अलंकापुरी आदी नावाने सुद्धा पुराणांमध्ये आळंदी क्षेत्राची ओळख करून दिल्याचे सांगितले जाते.आळंदी हे अठरा शिवपीठात वरिष्ठ मानले जाते. तसेच देवाधिदेव महादेवांचे कैलासानंतर सगळ्यात प्रिय स्थान म्हणजे अलंकापूर होय आणि ते इथेच सिद्धेश्वर रूपाने अखंड वास्तव्यास आहे.आळंदीची आणि पंढरीशी तुलना करताना संत निळोबाराय एका अभंगातून म्हणतात -

'एक भूवैकुंठ एक शिवपीठ'
महिमा वरिष्ठ दोहींचा '''

यंदा संत ज्ञानेश्वर महाराजांची सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती आपण साजरी करीत आहोत. संत ज्ञानेश्वरांच्या पदस्पर्शाने, कर्तव्याने पुनीत झालेल्या आळंदीत अनेक संतांनी सहवास घालविला आहे.संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, या ज्ञानेश्वरांच्या भावंडांच्या व्यतिरिक्त संत नामदेव, संत चांगदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार,संत सेना, संत जनाबाई. संत सोयराबाई ही संत मंडळी ज्ञानेश्वरांची समकालीन संत मंडळी होती. या संतांनी सुद्धा ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखाली समता, समानता आणि भक्ती परंपरेला समृद्ध केले. जणू त्यांच्यासाठी आळंदी पुण्यभूमीच होती. या वारकरी संतांनी अलंकापुरी पुण्यक्षेत्री येऊन आपली आध्यात्मिक उन्नती साधली आणि या क्षेत्राचा महिमा गायला आहे. संत नामदेव एका अभंगातून म्हणतात...

*'क्षेत्र महिमा अति अद्भुत'*
*आदि सिद्धेश्वर कुलदैवत*
*अलंकापुरी पाटणी'*

संत सेना महाराजांनी तर आळंदीला संतांचे माहेर म्हटले आहे.

(उर्वरीत भाग पुढील अंकी)



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

■ ■



## शरीरात व्हिटॅमिन्स कमी झाल्यास दिसतील ही लक्षणे

आहारामध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सचा समावेश करणे गरजेचे असते. व्हिटॅमिन डी हे आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे पोषक तत्व आहे. परंतु आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे, अस्वस्थ आहारामुळे आणि सूर्यप्रकाशाच्या कमी संपर्कामुळे लोकांना त्याची कमतरता भासत आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. आपल्याला बहुतेकदा सूर्यप्रकाशातून व्हिटॅमिन डी मिळते. याशिवाय, तुम्ही ते अनेक अन्नपदार्थांनी देखील पूर्ण करू शकता. आपल्या हाडांना बळकटी देण्यासाठी आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन डी खूप महत्वाचे आहे.

**थकवा जाणवणे** : हेल्थलाइनच्या मते, जेव्हा शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता असते तेव्हा सर्वात आधी थकवा येतो. अनेक अभ्यासातून असेही दिसून आले आहे की व्हिटॅमिन डीची कमतरता मुलांमध्ये तसेच वृद्धांमध्येही झोपेवर परिणाम करते. व्हिटॅमिन डीची कमतरता दूर करण्यासाठी पूरक आहार घेता येतो.

**हाड दुखणे** : हाडे मजबूत करण्यासाठी व्हिटॅमिन डी खूप महत्वाचे आहे. पण जर शरीरात त्याची कमतरता असेल तर हाडे कमकुवत होऊ लागतात. पाठदुखी आणि सांधेदुखी होणे सामान्य आहे. त्यामुळे हाडांचे नुकसान आणि ऑस्टिओपोरोसिसचा धोका देखील वाढतो. ही समस्या विशेषतः ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांमध्ये दिसून येते.

**चिंता आणि नैराश्य** : व्हिटॅमिन डीची कमतरता आपल्या मनःस्थितीवरही परिणाम करते. त्याचा परिणाम केवळ शारीरिक आरोग्यावरच नाही तर मानसिक आरोग्यावरही होतो. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे चिंता ते नैराश्यापर्यंतच्या समस्या उद्भवू शकतात. खरं तर, व्हिटॅमिन डी मेंदूतील सेरोटोनिन नावाच्या हार्मोनची पातळी नियंत्रित करते, परंतु जेव्हा त्याची कमतरता असते तेव्हा ते त्याचे काम योग्यरित्या करू शकत नाही आणि व्यक्तीला अस्वस्थता, चिंता आणि मूड स्विंगसारख्या समस्या येऊ लागतात.

**केस गळणे** : केसांच्या आरोग्यासाठी व्हिटॅमिन डी देखील महत्वाचे आहे. व्हिटॅमिन डीची कमतरता असल्यास केसांची मुळे देखील कमकुवत होऊ लागतात, ज्यामुळे केस गळण्याची समस्या वाढते. यासोबतच केस पातळ होण्यासही सुरुवात होते. जर महिलांमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता दीर्घकाळ राहिली तर केस गळण्यासोबतच टाळूशी संबंधित समस्यांचा धोका देखील असतो.

**वजन वाढणे** : वजन वाढणे हे देखील व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचे लक्षण आहे. खरं तर, व्हिटॅमिन डी चयापचय सक्रिय ठेवण्यास मदत करते. परंतु जेव्हा शरीरात त्याचे प्रमाण कमी होऊ लागते तेव्हा चयापचय देखील मंदावू लागते, ज्यामुळे चरबी कमी जळते. अशा परिस्थितीत, तुम्ही कितीही कसरत आणि आहार घेतला तरी, व्हिटॅमिन डीची कमतरता असल्यास, वजन कमी होण्यास बराच वेळ लागू शकतो.

**व्हिटॅमिन डीची कमतरता कशी दूर करावी?**

हेल्थलाइनच्या मते, व्हिटॅमिन डीची कमतरता दूर करण्यासाठी सूर्यप्रकाश घेणे महत्वाचे आहे. तुम्ही काही काळ सूर्यप्रकाश घ्यावा. याशिवाय, तुम्ही व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स देखील घेऊ शकता. त्याच वेळी, चरबीयुक्त मासे देखील व्हिटॅमिन डी वाढवण्याचा एक उत्तम स्रोत आहे. याशिवाय, अंड्याचा पिवळा भाग, फोर्टिफाइड दूध, रस आणि दही यांचा आहारात समावेश करता येतो.

■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### हे कृष्णा ..!

अर्जुनाचा सारथी बनुनी
तु दिलेस अध्यात्माचे धडे
तुज्या राजनीतीचे आजही
त्रिभूवनी वाजती चौघडे ..!

भ्रष्टाचाराने बरबटलेले
प्रजेचे काय करतील भले
देश गहाण टाकण्यासही
हे न पाहती मागे पुढे ...!

दिशाहीन राज्यकर्ते
रथ हाकती विनाशाकडे
हे कृष्णा, डोळस दृष्टी देण्या
तू ये सत्वर गडे ... !

राजनितीज्ञांचा पितामह तू
वंदन करती जग सारे
पण नेते आमचे स्वार्थापायी
आज ' राजधर्म ' विसरले रे ..

## नवी दिल्लीतील स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण वी मूव्हीज अँड टीव्हीवर पाहायला मिळणार

**नवी दिल्ली, १४ ऑगस्ट :** भारताच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त वी मूव्हीज अँड टीव्ही या वी च्या कन्टेन्ट ऍग्रीगेटर प्लॅटफॉर्मने नवी दिल्लीतील स्वातंत्र्यदिन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण, देशभक्तीपर सिनेमे आणि प्रीमियम ओटीटी शो हे सर्वकाही एकाच ठिकाणी उपलब्ध करवून देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे वी युजर्सना देशाच्या स्वातंत्र्यदिनी जास्तीत जास्त प्रेरणादायी व मनोरंजक अनुभव घेता येईल.
यंदाच्या स्वातंत्र्यदिनी वी युजर्सना पाहता येईल...
थेट प्रक्षेपण: नवी दिल्लीत लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिन सोहळा, ध्वजारोहण आणि माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे राष्ट्राला उद्देशून केलेले भाषण वी मूव्हीज अँड टीव्ही ऍपवर. वी मूव्हीज अँड टीव्ही सबस्क्रिप्शन नसली तरी सर्व वी युजर्स हे पाहू शकतील.
विशेष वॉचलिस्ट: वी मूव्हीज अँड टीव्हीने एक खास स्वातंत्र्यदिन वॉचलिस्ट तयार केली आहे. जिओ हॉटस्टार, सोनीलिव, झी५ आणि भारतातील इतर अनेक सर्वात लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्म्सवरील सर्वोत्तम कन्टेन्ट यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. एकच रिचार्ज करून हे सर्व एकाच ठिकाणी पाहता येईल. अनेक वेगवेगळ्या सबस्क्रिप्शन्स न करता फक्त एकाच सबस्क्रिप्शनमध्ये देशभक्तीपर सिनेमे आणि लोकप्रिय सीरिजचा आनंद वी ग्राहकांना घेता येईल. उरी: द सर्जिकल स्ट्राईक (झी५), मुखबीर – द स्टोरी ऑफ अ स्पाय (झी५), सॅम बहादूर (झी५), अवरोध: द सेज विदइन (सोनीलिव), नीरजा (जिओ हॉटस्टार) आणि इतर अनेक सुप्रसिद्ध सिनेमांचा यामध्ये समावेश आहे. साहस, त्याग आणि देशाभिमान यांच्या या कहाण्या वी युजर्सना प्रेरक ठरतील.

## आयबीएमने मुंबईत नवीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर सुरू केले



**मुंबई, १४ ऑगस्ट :** आज, आयबीएम (आयबीएम: एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.
या सेंटरचे उद्घाटन करताना महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करत आहोत.हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वतता आणि कार्यक्षमता वाढवू शकते, वाढ आणि प्रगतीसाठी नवीन संधी निर्माण करू शकते.आयबीएमसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, आम्ही क्वांटम इनोव्हेशनचा वापर जीवन परिवर्तनासाठी करू, त्याच वेळी त्याचे फायदे लोकशाहीकृत करण्यासाठी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी ते उपलब्ध करून देण्यासाठी कुशल प्रतिभा समूह तयार करू.
हॅन्स डेकर्स, जनरल मॅनेजर, आयबीएम एशिया पॅसिफिक म्हणाले, आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर भारतातील एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रातील प्रगतीस मदत करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकट करते. महाराष्ट्र सरकारला त्यांचा स्वतःचा सक्षम आणि प्रगत क्वांटम इकोसिस्टम तयार करण्यास मदत करण्याची आमची इच्छा हे आमच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे.
संदीप पटेल, मॅनेजिंग डायरेक्टर, आयबीएम इंडिया आणि साऊथ एशिया म्हणाले, देशाच्या राष्ट्रीय क्वांटम मिशन आणि विकसित भारतच्या उद्दिष्टांनुसार, राज्यात क्वांटम कम्प्युटिंग कौशल्ये वाढवण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आयबीएमला आनंद आहे.
आयबीएम इंडिया एक्सपिरीयन्स सेंटर हे मुंबईमधील आयबीएम इंडियाच्या नवीन ऑफिसमध्ये स्थित असेल आणि हे एक डायनॅमिक स्पेस असेल जिथे आयबीएम एक्सपर्ट, ग्राहक आणि भागीदार एकत्र येऊन भारताच्या व्यवसायातील अनोख्या आव्हानांसाठी सोल्यूशन्स तयार करतील. येथे एआय (ज्यात वॉटसनक्स प्लॅटफॉर्म समाविष्ट आहे), डेटा आणि ऑटोमेशन, सायबरसुरक्षा, हायब्रिड क्लाऊड, आणि कन्सल्टिंगच्या माध्यमातून होणारे परिवर्तन यांसारख्या आयबीएम च्या संपूर्ण पोर्टफोलिओतील सेवांचा अनुभव घेता येईल.

**HDFC BANK**
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय: एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई-४०००१३ आणि एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई – ४०००४२ येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून त्याचे एक कार्यालय आहे.

**लिलाव विक्री सूचना**

कर्जदारांना, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे जनतेला, याद्वारे सूचित केले जाते की खालील खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) ने कर्जाची थकबाकी भरण्यासाठी नोटीस देऊनही, त्यांनी स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार, ज्या कर्जदारांनी पैसे देण्यास चूक केली आहे त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षिततेचा लिलाव आहे. बँकेने कर्जदारांना नोटीस देखील जारी केली होती ज्याद्वारे, खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, असे न झाल्यास पुढील नोटीस जारी न करता संपूर्ण तारण ठेवलेल्या सोन्याच्या सुरक्षिततेचा लिलाव करण्यास बँकेला स्वातंत्र्य असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आणि पेमेंट करण्यात अयशस्वी झाले, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करुन तारण म्हणून कर्जदारांनी बँकेकडे दिलेले सोन्याच्या सुरक्षेवरील तारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि संपूर्ण सोन्याचे दागिने/सुरक्षा लिलावाद्वारे विकून आणि थकबाकी वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.
२२-०८-२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून खाली नमूद केलेल्या शाखेत लिलाव केले जातील. कोणत्याही तारण ठेवलेल्या तारखेचा लिलाव नमूद केलेल्या तारखेला आयोजित केला जाऊ शकत नाही किंवा पूर्ण केला जाऊ शकत नाही अशा स्थितीत, त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला आणि वेळेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

| कर्ज क्रमांक | कर्जदाराचे नाव | कर्जाची रक्कम | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 75489504 | गुलनाज परवीन शेखुमार | 420300 | एचडीएफसी बँक लिमिटेड सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 74371509 | एसके मोहिब एसके शोएब | 69400 | |
| 75629328 | शुभम रामरावजी ठाकरे | 37000 | एचडीएफसी बँक लिमिटेड रसिक प्लाझा, जयस्तंभ स्क्वेअर, मोर्शी रोड, अमरावती, महाराष्ट्र-४४४६०१ |
| 73558734 | मंगेश गजानन चोपडे | 16600 | एचडीएफसी बँक लिमिटेड ध्रुव मार्ट, एसबीआय मुख्य शाखेजवळ, खामगाव, महाराष्ट्र -४४४३०३ |
| 75358597 | प्रणिल अशोकराव गोजे | 25000 | एचडीएफसी बँक लिमिटेड निर्मल बेकरी स्क्वेअर, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, वर्धा, महाराष्ट्र-४४२००१ |
| 75399477 | झैदाली अझहर अलिस्येद | 43000 | |
| 75899326 | संतोषी महादेवराव चापडे | 128000 | एचडीएफसी बँक लि. भारुका भवन, यशवंत स्टेडियम समोर, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र-४४००१२ |
| 74080296 | लतीफ इक्बाल मलानी | 400000 | एचडीएफसी बँक लिमिटेड पोकर्ण टॉवर्स, महादेव मंदिर रोड, पोस्टल ग्राउंड समोर, यवतमाळ, महाराष्ट्र-४४५००१ |
| 73866388 | सुभाष कुमार | 299000 | एचडीएफसी बँक लिमिटेड पारस प्लाझा, दुकान क्रमांक १-९, अप्पर ग्राउंड, एसबीआय जवळ, रिसोड रोड, वाशिम, महाराष्ट्र – ४४४५०५ |
| 75882633 | कान्हा काळू यादव | 61000 | एचडीएफसी बँक लिमिटेड वर्धने टॉवर, एमआयडीसी गेटजवळ, बुटीबोरी, महाराष्ट्र-४४११०८ |
| 74122998 | शेषराव विठोबा मोहदरकर | 96000 | एचडीएफसी बँक लिमिटेड प्लॉट क्रमांक २२५, २२६, एमपीएलएच क्रमांक ८२. नझुल शीट क्रमांक २७, ब्लॉक क्रमांक ११, न्यू शिवाजी वॉर्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र-४४२३०१. |
| 75395897 | डॅनिश परवेझ अब्दुल | 105000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, दीपक ट्रेडिंग जवळ, बस स्टँडच्या शेजारी, एस नंबर २५५/डी, जिल्हा – बुलढाणा, मलकापूर, महाराष्ट्र ४४३१०१ |
| 75935956 | नरेंद्र मधुकर कोलते | 66400 | |
| 73628969 | शाहरिझवान उल्हाक सुलतानशाह | 43800 | एचडीएफसी बँक लिमिटेड व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती, महाराष्ट्र – ४४४६०४ |
| 73665492 | सुशांत विष्णू इंगळकर | 289500 | |
| 73755806 | सुशांत विष्णू इंगळकर | 119000 | |
| 75317611 | नजमुद्दीन शाबुद्दीन सय्यद | 70500 | एचडीएफसी बँक लिमिटेड साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र-४४२९०२ |
| 75393654 | तौफिक हबीब सय्यद | 101000 | एचडीएफसी बँक लि. साई राम प्लाझा, वसंतराव नाईक चौक, पुसद, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र-४४५२०४. |
| 75126043 | राहुल अशोक सानप | 123000 | एचडीएफसी बँक लिमिटेड प्लॉट क्रमांक ९, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिराजवळ, चावला पॅलेससमोर, वर्धा रोड, नागपूर, महाराष्ट्र-४४००१५ |
| 75456112 | शैलेश प्रकाश जाधव | 105600 | एचडीएफसी बँक लिमिटेड गोरंड आणि पहिला मजला, एमजे हायस्कूल समोर, शिवाजी नगर, करंज लाड, जिल्हा वाशिम -४४४१०५ |
| 75061780 | गजानन केसू पवार | 92000 | एचडीएफसी बँक लिमिटेड एस. क्रमांक २/१, वॉर्ड क्रमांक ०२, चिखली रोड, देऊळगाव राजा, जिल्हा-बुलढाणा, देऊळगाव राजा, महाराष्ट्र ४४३२०४ |
| 75508361 | भूषण सचिन ढाके | 105000 | एचडीएफसी बँक लिमिटेड अप्पर ग्राउंड फ्लोर, श्री राम टॉवर, एनएच ६, नांदुरा, जिल्हा बुलढाणा, नांदुरा, महाराष्ट्र ४४३४०४ |
| 75525693 | मोहम्मद सोहेल मोहम्मदनिसार | 23500 | |
| 75638082 | योगेश वसंत आखरे | 108000 | |
| 40001 39451 | मोहम्मद सोयब मोहम्मद शफी धारीवाला | 168000 | एचडीएफसी बँक लिमिटेड मेन रोड, नगर परिषद कार्यालयासमोर, आर्णी, आर्णी, महाराष्ट्र ४४५१०३ |
| 74728034 | नितीन परसराम डोंगरे | 38800 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला, कसारा क्रमांक ४-११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र-४४५२०६ |
| 75304185 | ओमनारायण परशराम केळकर | 52800 | एचडीएफसी बँक लिमिटेड ग्राउंड फ्लोअर, प्लॉट नंबर-७, दयानिधी, टिळक वाडी, बस स्टँड समोर, रामटेक जिल्हा- नागपूर, रामटेक, महाराष्ट्र-४४११०६. |
| 75214088 | निशिकांत रामेश्वरराव भांगे | 203900 | एचडीएफसी बँक लिमिटेड अडगोकर कॉम्प्लेक्स, एपीएमसी मार्केट समोर, अंजनगाव, सुर्जी, जिल्हा अमरावती, अंजनगाव सुर्जी, महाराष्ट्र-४४४७०५ |

लिलाव "जसे आहे तेथे" आणि "जसे आहे तसे" तत्त्वावर केला जाईल आणि बँक त्या सोन्याचे गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन या संदर्भात कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही. दागदागिने: बोली लावण्यापूर्वी नमूद केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन याबद्दल स्वत: ची पडताळणी करणे, तपासणी करणे व त्यांचे समाधान करणे ही संभाव्य खरेदीदारांची पूर्णपणे आणि परिपूर्ण जबाबदारी असेल आणि अशा हेतूने ते मुक्त असेल. संभाव्य खरेदीदारांना त्यांची एकमेव किंमत आणि खर्चाचे परीक्षण करणे आणि यापूर्वी दिलेल्या पत्त्यावर, लिलाव आयोजित करण्याच्या वेळेच्या ४५ मिनिट अगोदर तज्ञांच्या सल्ल्यासह किंवा नसलेल्या सोन्याचे दागिने.सर्व बोली बँकेला या संदर्भात निश्चित करणे योग्य वाटेल अशा किमान राखीव किंमतीच्या अधीन असतील. लिलावाचे मूल्य आयबीजेए (इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लिमिटेड) नुसार मागील दिवशी सोन्याच्या बंद किमतीवर आधारित असेल. सर्व बोली अधीन असतील लिलाव प्रक्रिया व विक्री (जर काही असेल तर) अशा लिलावाच्या अनुषंगाने बँकेच्या पुढील अटी व शर्तींच्या अधीन असतील जे बँकेने पुढील अटी व शर्तींच्या अधीन असतील. अटी लागू करणे योग्य नाही जर वर नमूद केलेला कर्जदाराने वरील प्रमाणे लिलाव करण्यापूर्वी त्याच्या वैयक्तिक कर्ज खात्यात असलेल्या कर्जाच्या कराराच्या अनुसार बँकेला दिलेली रक्कम भरली असेल तर, कर्ज घेतलेले तारण दागिने बँकेतून काढू शकतात पुढील सूचना न देता लिलाव केला. कृपया लक्षात घ्या की पूर्वसूचना दिल्याशिवाय लिलाव कार्यवाही पुढे ढकलणे किंवा रद्द करणे किंवा कोणतेही कारण न सांगता, लिलाव प्रक्रिया पुढे ढकलणे किंवा रद्द करणे आणि कोणतेही कारण न सांगता कोणतीही किंवा सर्व बिड किंवा ऑफर नाकारणे ही पूर्णपणे विवेकाधिकार बाब असल्याचे लक्षात घ्या.

तारीख: १५-०८-२०२५
ठिकाण : नागपूर

एसडी/-
प्राधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लि.

## अल्ट्रा पॉवर साउंड सिरीजअंतर्गत नवीन उत्पादनांसह सोनी इंडियाने पार्टीचा आनंद आणखी वाढवला




**नवी दिल्ली, १४ ऑगस्ट :** अल्ट्रा पॉवर साउंड सीरिजमधील अधिक ऍडव्हान्स्ड लाइनअपचे सोनी इंडियाने आज उद्घाटन केले. या नवीन श्रेणीमध्ये वायरलेस पार्टी स्पीकर्स अल्ट्रा टॉवर ९ आणि अल्ट्रा टॉवर ९एसी, वायरलेस ब्लूटूथ स्पीकर्स युएलटी फील्ड ५ आणि युएलटी फील्ड ३ तसेच युएलटी एमआयसी१ या वायरलेस ड्युअल माइकचा समावेश आहे. या सर्व स्पीकर्समध्ये मजबूत बाससाठी युएलटी बटण देण्यात आले आहे, जे वेगवेगळ्या साउंड मोडसह आवाज वाढवून दमदार आवाज देते.
सोनी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सुनील नय्यर यांनी अल्ट्रा पॉवर साउंड अंतर्गत या नवीन उत्पादनांबद्दल अत्यंत उत्साहात माहिती दिली. ते म्हणाले, आमच्या ग्राहकांचा ऐकण्याचा अनुभव अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी नवनवीन ऑडिओ उत्पादने देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. अल्ट्रा पॉवर साउंड सीरिजमधून आमचा हाच दृष्टिकोन समोर येतो. अल्ट्रा पॉवर साउंड शक्तिशाली बास इफेक्ट आणि इमर्सिव्ह ध्वनी देते. करण औजलासोबतच्या सहकार्याबद्दल ते म्हणाले, युएलटी श्रेणीसाठी ब्रँड अँबेसेडर म्हणून करण औजलाचा समावेश झाल्याबद्दल आम्हाला खूप आनंद होत आहे. तरुणांसोबतचे त्यांचे कनेक्शन आमच्या ब्रँडला साजेसे आहे. आमच्या उत्पादनांच्या माध्यमातून प्रत्येक श्रोत्यापर्यंत लाईव्ह परफॉर्मन्सचा अनुभव पोहोचवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. यामुळे ते खरोखरच संगीताचा आनंद घेऊ शकतील.
सोनी इंडियाचे ऑडिओ ब्रँड ॲम्बेसेडर करण औजला म्हणाले, सोनीच्या नवीन, अनोख्या अल्ट्रा पॉवर साउंड लाइनअपचा भाग असण्याचा मला खूप आनंद आहे. अल्ट्रा पॉवर साउंड श्रेणीतील उत्पादनांमुळे संगीत अनुभवण्याच्या आनंदात अधिकच भर पडते. मनाला शांतता देणारा, मनाचा तळ ढवळून काढणारा बास तसेच अत्यंत स्पष्ट आवाज यामुळे मिळतो. मी प्रवासात असलो किंवा घरी असलो तरी, अल्ट्रा पॉवर साउंड उत्पादने अगदी बारकाईने सगळे तपशील व्यवस्थित पोहोचवतात. याच्या आवाजाची गुणवत्ता तर पूर्वी कधीही अनुभवलेली नाही, अशी आहे.

## कलाकारांनी त्यांच्या जन्माष्टमी साजरीकरणाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला!

**मुंबई, १४ ऑगस्ट :** एण्ड टीव्ही कलाकारांनी जुन्या आठवणींना उजाळा देण्यासोबत त्यांच्या मूळगावामध्ये साजरा केल्या जाणाऱ्या जन्माष्टमी सणाबाबत सांगितले. मंदिरांमधील मधुरमय भजनांपासून झांकीचा उत्साह आणि पारंपारिक कौटुंबिक प्रथांपर्यंत प्रत्येक कलाकाराने या सणाच्या परंपरेशी जोडलेल्या त्यांच्या खास नात्याबाबत सांगितले. हे कलाकार आहेत पारस अरोरा (मालिका 'घरवालीपेडवाली'मधील जीतू), हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कटोरी अम्मा) आणि विदिशा श्रीवास्तव (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये जीतूची भूमिका साकारताना पाहायला मिळणारे पारस अरोरा म्हणाले, ''जन्माष्टमीबाबत माझ्या सर्वात गोड आठवणी बरेलीशी जुडलेल्या आहेत. संपूर्ण शहर हे मोठे कुटुंब एकत्र उत्सव साजरा करत असल्यासारखे वाटायचे. रस्ते दिव्यांनी उजळून निघायचे, मंदिरे आकर्षक फुलांच्या सजावटीने सजवलेली असायची आणि प्रत्येक कोपऱ्यातून भजनांचा आवाज ऐकू यायचा. मी मध्यरात्री आरतीची आणि झुलन उत्सवाची आतुरतेने वाट पाहायचो, फुलांनी सजवलेल्या पाळण्यांमध्ये बाळकृष्णाची लहान मूर्ती ठेवली जायची आणि पाळण्याला झोका दिला जायचा, जे खूप अद्वितीय होते. घरी, माझे कुटुंब नैवेद्य म्हणून माखन-मिश्री तयार करायचे आणि आम्ही सर्वजण पारंपारिक पोशाख परिधान करून जवळच्या कृष्ण मंदिरात जायचो. तो एकता, श्रद्धा आणि आनंदाचा काळ होता. आता, मुंबईत, मला जल्लोष आणि मधुरमय संगीतासह साजरा केला जाणारा दहीहंडी उत्सव आणि गोविंदाचे थर पाहायला आवडते. त्यामधून व्यक्त होणारी टीमवर्कची भावना आणि भक्ती प्रेरणादायी आहे. बरेली असो वा मुंबई, जन्माष्टमी सण नेहमी मला तोच आनंद देण्यासोबत भक्तीमय वातावरणामध्ये घेऊन जातो.''
मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''देहरादूनमधील जन्माष्टमीचे माझ्या मनात खास स्थान आहे. शहरामध्ये उत्सवाचे उत्साही वातावरण पसरलेले असते. बालपणी मी माझ्या कुटुंबासोबत ऐतिहासिक तापकेश्वर मंदिरामध्ये जायचे, जेथे कृष्ण जन्मोत्सव जल्लोषात साजरा केला जायचा, तेथील प्राचीन लेणी आणि नदीकाठ दिवे, झेंडूच्या फुलांचे हार आणि रात्रभर भजनांच्या आवाजाने उजळून जायचे. घरी, मला माझ्या आईला प्रसाद तयार करण्यास आणि आमच्या लहान बालकृष्णाच्या मूर्तीला आकर्षक कपडे व दागिन्यांमध्ये सजवण्यास मदत करायला खूप आवडायचे. या छोट्या पण अर्थपूर्ण विधींमुळे कुटुंबात उत्साह आणि एकतेचे वातावरण असायचे. आजही मी ही परंपरा जपते. भगवान कृष्णाच्या प्रेमात आणि भक्तीत संपूर्ण शहर एकत्र आलेले पाहताना मन प्रसन्न होऊन जाते. प्रत्येक जन्माष्टमीला त्या बालपणीच्या आनंदात परतल्यासारखे वाटते.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अनिता भाबीची भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव म्हणाल्या, ''वाराणसीत मोठी होत असताना पाहिलेला जन्माष्टमी सण जादुई होता. शहरातील घाट व मंदिरांमध्ये रोषणाई, भक्ती संगीत आणि कृष्णाच्या जीवनातील दृश्ये दर्शविणाऱ्या सुंदर कलाकृतींसह उत्साहपूर्ण वातावरण असायाचे. मला आठवते, मी बालकृष्णासाठी लहान पाळणा सजवायचे, माझी आई व आजीला माखन-मिश्री आणि धनिया पंजिरी तयार करण्यास मदत करायचे आणि मंदिरांमध्ये मध्यरात्रीच्या भावपूर्ण आरतीला उपस्थित राहायचे. ते क्षण माझ्या हृदयात कोरले गेले आहेत आणि मी ही परंपरा जपत आहे. या वर्षी, मी माखन-मिश्री, धनिया पंजिरी, खीर, ताजी फळे आणि माझे आवडते चुरमा लाडू असलेली उत्सवाची प्रसाद थाळी तयार करणार आहे. बाल गोपाळसाठी घर व पाळणा फुलांसह सजवणार आहे आणि आम्ही मध्यरात्री आरती व भजन गाणार आहोत.

## पडद्यावरून थेट हृदयात: सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेतील अन्विताच्या हृदयस्पर्शी कौटुंबिक संघर्षात सुम्बुल तौकीर खानच्या संघर्षाचे प्रतिबिंब दिसते

**मुंबई, १४ ऑगस्ट :** सोनी सबवर लवकरच इत्ती सी खुशी मालिका सुरू होणार आहे, पण त्या अगोदरच मालिकेचे हृदयस्पर्शी कथानक आणि अन्विता दिवेकर या केंद्रवर्ती व्यक्तिरेखेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुम्बुल तौकीर खानने साकारलेली अन्विता ही एक धडाडीची तरुणी आहे, जी स्वतःच्या खंबीर खांद्यावर आपल्या कुटुंबाचा भार वाहत आहे. सुम्बुल एक ताकदीची अभिनेत्री आहे, त्यामुळे तिने साकारलेली अन्विता प्रेक्षकांना नक्कीच खिळवून ठेवेल आणि या गोष्टीचे स्मरण देईल की अशा काही छोट्या छोट्या गोष्टी असतात, ज्या कुटुंबाला एकसंध ठेवतात.
अन्विता एक काल्पनिक व्यक्तिरेखा असली, तरी ती खूप जिवंत, हाडामासाची व्यक्तिरेखा आहे. आणि सुम्बुलच्या जीवनाशी तिचे बरेच साधर्म्य आहे. या मालिकेत अन्विता सहा भावंडांमध्ये सर्वात मोठी आहे. आई सोडून गेल्यावर आणि वडील व्यसनाधीन झाल्यावर कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली आहे. आपल्या भावंडांना काही कमी पडू नये म्हणून तिने आपले तारुण्य, आपली स्वप्ने, स्वतःचे सुख दूर सारले आहे. पडद्याच्या मागे सुम्बुल तौकीर खानच्या कहाणीतील परिस्थिती वेगळी असली, तरी जबाबदारीची जाणीव, भावनिक परिपक्वता आणि मूक चिवटपणा अन्विताप्रमाणेच आहे.
सुम्बुलसाठी अन्विताची व्यक्तिरेखा साकारणे हा एक अत्यंत भावनिक आणि वैयक्तिक अनुभव आहे. या व्यक्तिरेखेच्या अंतरंगात तिच्या स्वतःच्या प्रवासाचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे ही भूमिका तिच्या अंतःकरणाच्या खूप जवळची आहे. अन्विताची भूमिका करताना आपल्या स्वतःच्या जीवनातील काही क्षण ती पुन्हा अनुभवत आहे. अन्विताचा मूक संघर्ष, समजूतदारपणे उचललेली जबाबदारी आणि संसाराचा गाडा रेटण्यासाठी लागणारी हिंमत ती समजू शकते. लहान वयातच एक आई, संरक्षक आणि प्रदाता बनलेल्या अन्विता प्रमाणे सुम्बुल देखील अकाली प्रौढ आणि समजूतदार झालेली मुलगी आहे. सिंगल पॅरेंटकडे वाढलेल्या सुम्बुलला देखील लवकरच आपल्या जबाबदारीची जाणीव झाली आणि आपल्या वडिलांना आणि लहान बहिणीला आधार द्यावा लागला.
इत्ती सी खुशी मालिकेत अन्विताची भूमिका साकारण्याबाबत सुम्बुल तौकीर खान म्हणते, अन्विता ज्या समजूतदारपणे आपल्या कुटुंबाचे दुःख सोसते, कुटुंबाला ओझे न मानता आपली जबाबदारी मानते, त्याच्याशी मला स्वतःचे साम्य दिसते. ही अशी भूमिका आहे, जी माझ्यातील कलाकाराला आव्हान देते आणि त्याच बरोबर माझ्या जीवनातील काही तुकडे पडद्यावर साकारण्याची संधीही देते. माझ्या आयुष्यात देखील एक काळ असा होता, जेव्हा जीवन अनिश्चित होते, मी माझ्या वडिलांना, बहिणीला आणि कुटुंबाला चांगले भविष्य मिळावे म्हणून धडपड करत होते.

## एचडीएफसी अर्गो ने फोनपे बरोबर केली भागीदारी

**नागपूर, १४ ऑगस्ट :** भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने एचडीएफसी अर्गोच्या सुरक्षा संकल्पच्या माध्यमातून आरोग्य विषयक अनिश्चिततेवर उपाय उपलब्ध, कोणतेही आरोग्य विमा कवच नसलेल्या अंदाजे ४० कोटी भारतीयांसाठी योजना संपूर्ण भारतात आरोग्य विम्याचा प्रसार करण्याच्या उद्देशाने एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील जनरल विमा कंपनी ने फोन पे बरोबर सहकार्य करत असल्याची घोषणा केली. या सहकार्या अंतर्गत भारतातील मिसिंग मिडल लोकांसाठी विशेषरुपाने तयार करण्यात आलेले आरोग्य विमा उपाय उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.
फोन पे बरोबरची एचडीएफसी अर्गो ची भागीदारी ही एक योजनाबध्द भागीदारी असून यामुळे आता विश्वसनीय अशा डिजिटल पेमेंट मंचासह विश्वसनीय अशा पहिल्या डिजिटल विमा प्रदात्या बरोबरची ही युती आहे. फोन पेच्या डिजिटल पायाभूत सुविधांचा वापर करुन या मिसिंग मिडल भारतीयांना आता एचडीएफसी अर्गोच्या सर्वसमावेशक आरोग्य विमा योजना परवडणाऱ्या प्रिमियम मध्ये उपलब्ध होणार आहेत.
या सुरुवाती विषयी माहिती देतांना एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स चे कार्यकारी संचालक पार्थनील घोष यांनी सांगितले निती आयोगाच्या अहवाला नुसार भारतातील अंदाजे ४० कोटी लोकांना मिसिंग मिडल म्हणून संबोधले जाते. कारण त्यांच्याकडे कोणतेही आरोग्य विमा कवच नसते. हीच दरी भरुन काढण्यासाठी एचडीएफसी अर्गोच्या सुरक्षा संकल्प च्या माध्यमातून आम्ही त्यांना कॅशलेस हेल्थ इन्शुरन्स प्लान सह ओपीडी पासून ते हॉस्पिटल मधील उपचारांपर्यंत सर्व सुविधा उपलब्ध करुन देत आहोत.
या विषयी आपले मत व्यक्त करतांना फोन पे इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस चे सीईओ विशाल गुप्ता यांनी सांगितले सर्वसमावेशक आरोग्य विमा ही मुलभूत गरज आहे आणि फोन पे मध्ये आम्ही प्रत्येक भारतीयाच्या वित्तीय भविष्यासह कल्याणावर सकारात्मक परिणाम करण्यावर भर देत असतो. या उपक्रमाच्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल असून एचडीएफसी अर्गो तर्फे मिसिंग मिडल साठी विशेष योजनेत भागीदारी करतांना आंम्हाला अभिमान वाटतो. ही योजना खूपच परवडणारी तर आहेच पण त्याच बरोबर असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आरोग्य विमा योजनेचा लाभ मिळावा यासाठी तयार करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून आम्ही गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा देशातील कोट्यावधी गरीबांसाठी महाग प्रिमियमचा भार न देता उपलब्ध करुन देत आहोत. आमचे हे लक्ष्य आहे की देशात विविध आर्थिक आणि समाजिक स्तरातील लोकांना विमा उपलब्ध करुन देऊन त्यांच्या अनोख्या गरजांनुसार डिजिटल फर्स्ट उपाय ही उपलब्ध करुन देणे.

## आज का अंदाज

शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| २५६ | १६९ | २३४ | १९० | १५७ | १६७ | १२४ | २६० |
| ६७० | ३४९ | ३४९ | ४६० | ४९० | ३५६ | २७८ | ४५९ |
| १२० | ७९० | ४५० | ३७० | ५८० | २२० | ४६७ | ३७८ |
| ३२ | ६२ | ९८ | ०८ | ३५ | ४५ | ७१ | ८१ |
| ३१ | ६१ | ९७ | ०७ | ३२ | ४२ | ७६ | ८६ |
| ३४ | ६४ | ९५ | ०५ | ३९ | ४९ | ७० | ८० |

**१४ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ५२ | ८२ |
| १९ | ४९ | ५३ | ८३ |
| १७ | ४७ | ५६ | ८६ |
| ४८९ | ६८० | १५९ | १३४ |
| ५६० | ७८९ | २५८ | ३५० |
| ६६९ | ५९० | ३५७ | २६० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## वीर हनुमान मालिकेत हनुमानाने सूर्य देव आणि शनि देवाचे मीलन घडवले

**मुंबई, १४ ऑगस्ट :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेतील भक्ती आणि भावना प्रेक्षकांना आकर्षित करतात. या मालिकेत आन तिवारीने बाल हनुमानाची भूमिका केली आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीच्या भूमिकेत दिसत आहेत. माहिर पांधीने वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका साकारली आहे. ही मालिका आता अशा टप्प्यावर आहे, जेथे कौटुंबिक भावबंध आणि दिव्य मीलन प्रेक्षकांना बघायला मिळेल. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की सूर्य देवाचा शिष्य म्हणून आपले कर्तव्य पूर्ण करण्यास हनुमान कटिबद्ध आहे.
आगामी भागांमध्ये, हनुमानाला छाया आणि तिचा पुत्र शनि देव यांची करूण कहाणी समजेल आणि त्यांच्यात आणि सूर्यात प्रदीर्घ काळापासून दुरावा असल्याचे कारण उमगेल. या दिव्य कुटुंबातील दुरावा दूर करून छाया आणि शनि देवाला सूर्याच्या दरबारात घेऊन येण्यासाठी हनुमानाला एका तीव्र आणि नाट्यमय संघर्षाला सामोरे जावे लागते. तेथे, एका भावुक क्षणी, सूर्य देव आणि शनि देव एकत्र येतात आणि एकमेकांना माफ करून दुरावा मिटवतात. हनुमानाचा पराक्रम आणि करुणा भाव पाहून प्रसन्न झालेला सूर्य देव त्याला आपला शिष्य म्हणून स्वीकारतो. आणि येथून सुरू होते एक घनिष्ठ गुरु-शिष्य नाते.
सूर्यलोकात आलेल्या या सुसंवादामुळे हनुमानासाठी अधिक मौलिक धडे आणि आव्हानांचे दरवाजे उघडतील का?
बाल हनुमानाची भूमिका साकारत असलेला अभिनेता आन तिवारी म्हणतो, या कथानकासाठी अभिनय करत असताना सूर्य देव आणि शनि देवाच्या कथा मला जणायला मिळत आहेत. इतरांची काळजी घेणे, नात्यांचे मोल जाणणे आणि बिनसलेल्या गोष्टी सुधारण्यासाठीची हिंमत बाळगणे याबाबतचे धडे या कथाभागातून मला मिळाले आहेत. हनुमानाची भूमिका करत असल्याचा मला अभिमान वाटतो, कारण मला देखील हे समजते आहे की लोकांना एकत्र आणणे किती महत्त्वाचे आहे.

## राशीभविष्य

**मेष :** राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ शकतात. न्यायालयीन खटल्यांमध्ये किंवा वादांमध्ये, उच्चपदस्थ व्यक्ती विशेष मदत करेल. प्रिय व्यक्तीकडून विशेष सहकार्य मिळाल्यास कार्यक्षेत्रातील अडथळे दूर होतील.

**वृषभ :** विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. राजकारणात गुंतलेल्या लोकांना उच्च पद मिळू शकते. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागेल.

**मिथुन :** आज तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा भांडण होऊ शकते. कामाच्या ठिकाणी अतिरिक्त जबाबदाजयांमुळे त्रास होईल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते.

**कर्क :** आज चांगली नोकरी मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुम्ही मित्रांसोबत चांगला वेळ घालवाल. वरिष्ठ अधिकाजयाशी तुमची जवळीक वाढेल.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी कमी अडथळे असल्याने तुमची कार्य योजना यशस्वी होईल. नोकरीत बढती झाल्याने नोकरदारांचा आनंद वाढेल. कठोर परिश्रम करण्यास मागे हटू नका, तुम्हाला यश मिळेल.

**कन्या :** तुमच्या मनातील इच्छा पूर्ण होऊ शकतात. कौटुंबिक समस्या वाढू देऊ नका. तुमची महत्त्वाची कामे वेळेवर पूर्ण करा. अन्यथा, आधीच केलेले काम बिघडू शकते. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**तुळ :** कुटुंबात शुभ आणि धार्मिक कार्यक्रम होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम करूनही तुम्हाला अपेक्षित परिणाम मिळणार नाहीत. सहकाजयांसोबत मतभेद होऊ शकतात.

**वृश्चिक :** भावनिक अवस्थेत असे काहीही करू नका ज्यामुळे तुमच्यासाठी त्रास होऊ शकेल. नोकरीत तुम्हाला कनिष्ठ आणि वरिष्ठांकडून सहकार्य मिळेल. व्यवसायाच्या ठिकाणी आगीची भीती राहील.


**धनु :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. स्पर्धांमध्ये यश मिळण्याचे संकेत आहेत. राजकीय स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल.

**मकर :** आज घरात पाहुण्यांच्या आगमनामुळे तुम्हाला खूप आनंद होईल. कामात येणारे अडथळे दूर होतील. सामाजिक क्षेत्रात तुमची प्रतिष्ठा वाढेल. प्रवास करताना विशेष काळजी घ्या. तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ :** आज निरुपयोगी वाद टाळा. अन्यथा वाद हाणामारीचे रूप घेईल. तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. कामावर अपेक्षित सहकार्य मिळेल.

**मीन :** कुटुंबातील तणाव मोठ्या, ज्येष्ठ व्यक्तीच्या मदतीने दूर होईल. यामुळे तुमचा उत्साह वाढेल. प्रवासादरम्यान कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका.

## शब्दकोडे क्रमांक २१९२



**आडवे शब्द :-**
१) ह्या विमानांनी बालाकोटवर बॉम्ब वर्षाव केला
७) सपाट
१०) मीठ
११) एक क्षार
१२) पंधरवडा
१३) मुसलमानांचा उपवासाचा महिना
१५) वांती
१७) अवस्था, स्थिती
१८) अगदी गोलाकार
१९) जिम्मेदार
२१) सप्तस्वरातील पहिला स्वर
२३) पंकज
२४) नाश, शेवट, लय
२५) बाण
२६) मनातील इच्छा
२७) भांडण, चर्चा
२८) मनाला वाटणारी अनिश्चिततेची भीती
३०) शक्ती, जोर, बळ
३२) मर्यादा, सीमा
३३) विळखा
३४) शेवटचा भाग
३६) आवळा फळाचा एक गोड औषधी प्रकार
३७) देवाचे मानवी रूप
३८) कर्ज देणारा
४१) उंट हाकणारा
४३) च्या पुढे, च्या देखत
४५) लेखणीच्या एका फटक्याने दुसऱ्याचे कायमचे नुकसान करणारा
४८) सुस्ती
५०) श्रीरामाच्या एका पुत्राचे नाव
५१) प्रेमळ
५२) उत्तम सोने
५५) विशेष
५७) नोकर
५८) हेळसांड
५९) लपेटी अक्षराचा फाटा
६१) स्त्री, बाई
६२) पंख
६३) आजोबा
६४) कापड
६६) उद्याच्या नंतरचा दिवस
६८) मत्सर
६९) वाळवू ठेवलेली पालेभाजी
७०) नाविकदल

**उभे शब्द :-**
१) सूर्याचे एक नाव
२) जन्मापासून
३) ताठा, गर्व
४) हिरव्या विषारी सापाची जात
५) कंटाळवाणे (भाषण)
६) आजोबांचे वडील
७) घरोघर जाऊन भविष्य सांगणारा
८) तापविणारा सूर्य
९) अवधान, चित्त
१४) नंतर
१६) मृताची क्रिया
१८) श्रीविष्णूचे बटु रूप
१९) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू
२०) कापडी बैठक, सतरंजी
२२) ऐक्य, तादाम्य
२३) उणीव
२४) शेराचा अठवा भाग
२८) पळापळ
२९) जुळा
३१) फणसाचा एक प्रकार
३३) अगदी क्षुल्लक किमतीचे
३४) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोबद्दलचा द्वेष
३५) सैन्यदल
३६) मयूर
३८) लहान
३९) अंजन
४०) वचक, भीती
४१) शिर्डीचे संत
४२) बुटका
४४) कोकणातील एक दैवत
४६) जलदीने, झटकन
४७) मनाचा ओढा
४८) थारा
४९) सोबती, मित्र
५३) सततची हालचाल
५४) प्रेतावरचे वस्त्र
५६) कमीजबरोबरचे एक वस्त्र
५८) थप्पड
५८) आजोबा
६०) घोड्याची लाथ
६३) कुंभाराची भट्टी
६५) एक अधिक एक चतुर्थांश
६७) लक्ष्मीचे एक नाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कुही गावात पक्कया रस्त्यांसाठी चिखलफेक आंदोलन

## पावसाळ्यात वारंवार तुटतो चाळीस गावचा संपर्क ■ रस्त्यांची दयनीय अवस्था कायम

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.14 )** – मेळघाटातील हतरु परिसरातील 40 ते 50 गावांचा संपर्क पावसाळ्यात पूर्णपणे तुटतो. चिखलदरा तालुक्यातील रस्ते चिखलमय आणि खडतर झाल्याने वाहने चालवणे अशक्य होते. अनेक पुलांवरून पाणी वाहते, तर काही पुलांची स्थिती अतिशय जीर्ण आहे. परिणामी, या भागातील आदिवासी बांधवांना आणि नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. या सर्व परिस्थितीला कंटाळून, सामाजिक कार्यकर्ते भैय्यालाल मावसकर यांच्या नेतृत्वाखाली कुही गावात चिखल फेक आंदोलन करण्यात आले. शासनाकडे वारंवार तक्रारी करूनही पावसाळ्यापूर्वी कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. आजारी पडलेले रुग्ण असो किंवा तातडीचे काम, नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी पोहोचणे मोठे आव्हान ठरते. अनेक वेळा या रस्त्यांवरून जाणे शक्यच नसते. गेल्या 70-75 वर्षांपासून रस्त्यांची हीच अवस्था कायम असून स्वातंत्र्यानंतरही दुरुस्ती झाली नाही. राज्य सरकारने या भागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. आंदोलनात सामान्य नागरिकांसह गावातील महिलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. हे आंदोलन सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने पावले उचलण्याच्या मागणीसाठी आयोजित करण्यात आले होते. स्थानिकांचा इशारा आहे की, शासनाने त्वरित रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेतले नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.



# ग्राहकांच्या परवानगीशिवाय तालुक्यात स्मार्ट मीटर बसणार नाही!

## सागर हुरबडे यांच्या आंदोलनाची यशस्वी सांगता

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.14 )** – गेल्या सहा महिन्यांपासून तालुक्यात गाजत असलेल्या स्मार्ट मीटर विरोधातील लढ्याला अखेर यश आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे कार्यकर्ते सागर हुरबडे यांच्या काल (दि. 13) पासून सुरू असलेल्या आमरण उपोषणानंतर विज वितरण कंपनीच्या अधिकार्यांनी ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविणार नसल्याचे आश्वासन आमदार गजानन लवटे यांच्या उपस्थितीत दिले.

ग्रामीण भागात कोणतीही पूर्वसूचना न देता व परवानगी न घेता गेल्या काही महिन्यांपासून स्मार्ट मीटर बसविण्यात आले होते. यामुळे विजेची बिले प्रचंड वाढली होती आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी उसळली होती. आमदार लवटे यांनीही वारंवार तंबी दिल्यानंतरही ही प्रक्रिया सुरूच राहिल्याने सागर हुरबडे यांनी आमरण उपोषणाचा इशारा देत आंदोलन पेटवले.

आज (दि. 14) विज वितरण कंपनीचे अधिकारी आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांनी तालुक्यात ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर न बसविण्याचे तसेच आधी बसविलेल्या मीटरवरील बिले सरासरी प्रमाणात देण्याचे आश्वासन दिले. तहसीलदार पुष्पा सोळंके, अचलपूरचे अति. कार्यकारी अभियंता फुटाणे, राजेश तिवारी, टि. डी. गाजरे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी काँग्रेस, संभाजी ब्रिगेड, राष्ट्रवादी आदी पक्षांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. हुरबडे यांनी आश्वासनाची पूर्तता न झाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.



# अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचा 17 ऑगस्टला पंधरवाडा समारोप

## जिल्ह्याभरातील पत्रकार बांधव होणार सहभागी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.14 )** – अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाने संघटनेचे केंद्रीय व राज्य पदाधिकार्यांच्या वाढदिवस निमित्त राज्यभर 1 ते 15 ऑगस्टदरम्यान विविध सामाजिक व उपयुक्त उपक्रमांचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा समारोपीय कार्यक्रम रविवार, 17 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता चांदूर रेल्वे येथील कुर्‍हा रोडवरील गोरडे वाडी येथे पार पडणार आहे.

पहिल्या टप्प्यात, केंद्रीय संपर्कप्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर वृक्षारोपण, रोगनिदान शिबिरे, पत्रकार मेळावे, शालेय साहित्य वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले. पत्रकारांनी केवळ बातम्यांपुरते मर्यादित न राहता सामाजिक भान राखून जनतेसाठी उपयुक्त उपक्रम राबवावेत, या उद्देशाने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दुसर्‍या टप्प्यात, संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांच्या वाढदिवसानिमित्त 2 ऑगस्ट रोजी शिरजगाव कसबा येथे पत्रकार संवाद मेळावा घेण्यात आला.

तसेच 15 ऑगस्टला केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यांचा वाढदिवस साजरा करताना 'पंधरवाडा' उपक्रमाचा औपचारिक समारोप करण्याचे ठरले. समारोपीय कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य केलेल्या पत्रकारांचा सत्कार केला जाणार आहे. या वेळी अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे केंद्रीय व राज्य पदाधिकारी, अमरावती जिल्ह्यातील संपादक मंडळी व पत्रकार बांधव उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे युसुफ खान, प्रा. रवींद्र मेंढे, बाळासाहेब सोरगीवकर, उत्तमराव गावंडे, प्रभाकर भगोले, विवेक राऊत, अमोल गवळी, निशिकांत देशमुख, राजीव शिवणकर, अमर घटारे, इरफान पठान, धिरज नेवारे, शहेजाद खान, राहुल देशमुख, रितेश मुंधडा, रवि कलाने, विनय गोटेफोडे, प्रकाश रंगारी, पियुष ठोंबरे, मनिष खुणे, प्रशांत सिसोदिया, संजय डगवार आणि अजय गावंडे यांनी केले आहे.



# अतिवृष्टीत नुकसान झाले तरी भरपाईपासून वंचित

## आर्थिक मदतीची वाढती मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.14 )** – बेनोडा शहीद मंडळातील संत्रा उत्पादक शेतकर्‍यांना मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीबाबत शासनाने भरपाई दिली. मात्र, याच अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील ज्वारी, सोयाबीन, तूर, कपाशी यांसारख्या पिकांचे झालेले नुकसान दुर्लक्षित राहिल्याने हजारो खरीप शेतकरी भरपाईपासून वंचित आहेत.

संत्रा उत्पादकांना मिळालेली मदत स्वागतार्ह असली तरी खरीप शेतकर्‍यांच्या नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याची भावना निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे अनेक शेतकर्‍यांचे पीक पाण्यात गेले, तर काहींना वेळेवर काढणीही करता आली नाही. पेरणीसाठी घेतलेले कर्ज, बियाणे, खत, मजुरी या सर्व खर्चाचा भार शेतकर्‍यांच्या खिशाला चटका देणारा ठरला आहे.

स्थानिक शेतकरी संघटना आणि ग्रामपंचायतींमार्फत खरीप शेतकर्‍यांना 'विशेष बाब' म्हणून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शासनाकडे केली जात आहे. अतिवृष्टीचा फटका बसलेले सर्वच शेतकरी समान आहेत, मग भरपाई फक्त निवडकांना का? असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. बेनोडा शहीद व परिसरातील शेतकर्‍यांनी प्रशासनाकडे तत्काळ सर्वेक्षण करून खरीप पिकांच्या नुकसानीचा अहवाल तयार करण्याची मागणी केली आहे. शासनाने खरीप शेतकर्‍यांची परिस्थिती ओळखून लवकर निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. सध्या खरीप शेतकरी वार्‍यावर आहेत. शासनाने संवेदनशीलता दाखवून तातडीने मदतीचा निर्णय घेतला नाही, तर असंतोषाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## मोटारसायकल-पिकअपच्या भीषण धडकेत तरुणाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**शिरजगाव कसबा, ( दि. 14 )** – बुधवारी (13 ऑगस्ट) रात्री सुमारे 10 वाजता शिरजगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीतील चांदूर बाजार-शिरजगाव कसबा मार्गावर सोमवार खेडा जवळ मोटारसायकल व पिकअप वाहनामध्ये झालेल्या भीषण धडकेत एका तरुणाचा मृत्यू झाला. अपघातानंतर पिकअप चालक वाहन सोडून फरार झाला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, भाजीपाला भरलेला पिकअप (क्रमांक एमएच. 27.बीबी. 2384) मध्य प्रदेशातील आठनेरहून चांदूर बाजारमार्गे यवतमाळकडे जात होता. त्याचवेळी चांदूर बाजारकडून येणारी मोटारसायकल (क्रमांक एमएच. 27.सीएम. 4427) पिकअपला समोरून धडकली. जोरदार धडकेत मोटारसायकलस्वार अमोल मारोतराव बनसरे (वय 27 ते 30, रा. शिंगोरी, मोर्शी) गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याचे अधिकारी महेंद्र गवई यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि जखमीला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# वृक्षाचे संवर्धन झाले तरच भविष्यातील पर्यावरण अबाधित राहील - क्षितिज अभ्यंकर

## विद्यार्थ्यांना गणवेश वितरण कार्यक्रम




**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.14 )** -ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपणासोबत वृक्षसंवर्धनावर अधिक भर देण्याची गरज आहे. वृक्षाचे संवर्धन झाले तरच भविष्यातील पर्यावरण अबाधित राहील, असे प्रतिपादन राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावतीचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर यांनी केले. ते श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालय, हंतोडा येथे झालेल्या गणवेश वितरण व वृक्षारोपण कार्यक्रमात बोलत होते.

हा कार्यक्रम संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर यांच्या प्रेरणेतून, दि. 12 मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. अध्यक्षस्थानी क्षितिज अभ्यंकर, तर प्रमुख पाहुणे सचिव गजानन वानखडे, प्रकाशराव पटेल, सुधीर गोळे, अनिल पटेल, शेख नसीब, रमेश आठवले, तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश आणि स्व. रामेश्वराव मोहोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 8वीच्या विद्यार्थ्यांना शालेय पिशव्या वाटप करण्यात आल्या. यावेळी शालेय निवडणुकीत निवडून आलेल्या प्रतिनिधी ङ्क प्रणय खंडारे, आराध्या आठवले, संचित खारोडे, पलक गोळे, सम्यक आठवले, मानव आठवले, मोहम्मद रिजवान आणि सात्विक खारोडे यांचा सन्मान करण्यात आला. सचिव गजानन वानखडे यांनी शालेय गणवेशामुळे शिस्त आणि ऐक्य वृद्धिंगत होतो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केतन खिरकर यांनी केले, सूत्रसंचालन अनंता मोहोड यांनी तर आभार सारिका वाठ यांनी मानले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक, गावकरी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# अचलपूरच्या आमदारांसमोर विकासाची आठ डोंगराएवढी आव्हाने



***अचलपूरचा विकास हा फक्त राजकीय अजेंडा न राहता, लोकहिताचा विषय व्हायला हवा. आश्वासनांपलीकडे जाऊन ठोस कृती केल्यासच आमदार प्रवीण तायडे नागरिकांचा विश्वास जिंकू शकतील. आव्हाने गंभीर आहेत, परंतु इच्छाशक्ती आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी समाधान निश्चितच शक्य आहे.***

**बातमीपत्र**
**बादल डकरे,** चांदुर बाजार (मो. 9975844638)



प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक तथा राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू यांची सत्ता उलथवून दोन दशकांनंतर अचलपूर मतदारसंघाने बाहेरील असलेल्या व्यक्तीला कमळ या चिन्हावर निवडून दिले. आक्रमक चेहरा म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रवीण तायडे यांना भाजपचे लेबल मिळाल्याने राजकीय बळकटी मिळाली आहे. मात्र ते मूळचे मतदारसंघातील नसले तरी, मतदारसंघाच्या विकासाची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. कारण, अचलपूर हा विदर्भातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या गुंतागुंतीच्या समस्यांनी वेढलेला महत्त्वाचा भाग आहे.

**बेरोजगारी - तरुणांची ज्वलंत समस्या**

स्थानिक पातळीवर उद्योगधंद्यांचा अभाव, प्रशिक्षण सुविधांची कमतरता आणि शासन योजनांची अपुरी अंमलबजावणी यामुळे शिक्षित तरुण मोठ्या शहरांकडे स्थलांतर करत आहेत. कौशल्य विकास केंद्र, स्टार्टअप प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योग उभारणी हे या प्रश्नाचे मुख्य उपाय आहेत.

**स्थानिक रोजगार निर्मिती घराजवळच संधी**

स्थानिक उद्योग, बीपीओ, आयटी सेवा केंद्र, फळ प्रक्रिया आणि दूध डेअरी प्रकल्प उभारल्यास युवकांना गावातच रोजगार मिळू शकतो. यासाठी अनुदान, भूखंड आणि प्रशिक्षण केंद्रांची गरज आहे.



**जिल्हा निर्मिती ङ्क स्वाभिमानाचा लढा**

अचलपूर-परतवाडा येथे स्वतंत्र जिल्हा नसल्याने नागरिकांना अमरावतीला वारंवार धाव घ्यावी लागते. हा केवळ विकासाचा नव्हे, तर स्वाभिमानाचा मुद्दा आहे.

**फिनले मिल - रोजगाराचा हरवलेला स्त्रोत**

एकेकाळी हजारो लोकांना रोजगार देणारी फिनले टेक्सटाईल मिल आज बंद आहे. पीपीपी मॉडेलद्वारे ती पुन्हा सुरू केल्यास अर्थव्यवस्थेला गती मिळेल. वेतनाच्या मुद्द्यावर आमदारांनी भूमिका घेतली असली, तरी कामगारांचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. सध्या येथे आंदोलन सुरू आहे.

**शकुंतला रेल्वे - विस्मृतीत गेलेला वारसा**

ब्रिटिशकालीन शकुंतला रेल्वे बंद पडली असून, ती पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे ठोस पाठपुरावा अपेक्षित आहे. पूर्वी ही वाहतुकीचा स्वस्त व सुलभ मार्ग होती.

**अवैध धंद्यांचा विळखा**

दारू विक्री, गुटखा, सट्टा, गांजा आणि गौवध तस्करीमुळे कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी आमदारांनी वाळू तस्करीवर कारवाई केली, तसेच भाजप पदाधिकार्यांनी अवैध धंद्यांविरोधात आंदोलन केले. मात्र, सातत्याने देखरेख आणि कठोर अंमलबजावणी गरजेची आहे.

**शेतकर्‍यांच्या समस्या - आत्महत्येच्या उंबरठ्यावर श्रमवीर**

अपुरा पाऊस, सिंचनाची कमतरता, हमीभावाचा अभाव आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी त्रस्त आहेत. पीक विम्याची प्रभावी अंमलबजावणी आणि आधुनिक शेतीसाठी सुविधा पुरवणे आवश्यक आहे.

**अतिक्रमण - शहराचा गुदमरलेला श्वास**

अचलपूर, परतवाडा आणि चांदुर बाजारमध्ये रस्त्यांवरील अतिक्रमण वाहतुकीस अडथळा ठरत आहे. हे हटवण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि ठोस निर्णय आवश्यक आहेत.

# डाक विभागातर्फे 'हर घर तिरंगा' रॅली



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त डाक विभागाने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत भव्य रॅलीचे आयोजन केले. या रॅलीत डाक विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

देशाच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, मंगळवारी (दि. 12 ऑगस्ट) अमरावती प्रधान डाकघर येथून रॅलीची सुरुवात झाली. नागरिकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजाविषयी आदराची जाणीव निर्माण करणे हे मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट होते. रॅलीदरम्यान सहभागी तिरंगा हातात घेऊन देशभक्तीपर घोषणा देत मार्गक्रमण करत होते. जयस्तंभ चौकात पोहोचल्यावर, रॅलीचे नेतृत्व करणारे प्रधान डाकपाल सुजितकुमार लांडगे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. यावेळी अन्य अधिकारी-कर्मचारी देखील नतमस्तक झाले. प्रभात टॉकीज मार्गे परत प्रधान डाकघर येथे रॅलीचा समारोप झाला. संपूर्ण परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले असून 'हर घर तिरंगा'अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# माणसाने माणसाशी सौख्याने वागावे!

आपल्या प्रिय भारत देशाला इंग्रजी राजवटीच्या पारतंत्र्यातून १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला पवित्रतेचे श्रेय मिळाले. ती आजपावेतो आपण जोपासुन इतिहासातील पवित्र घटनांची स्मृती कायम ठेवूनच आज आपण देशात ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिना निमित्त आम्ही भारतीय आहोत याबाबत आम्हाला आत्मविश्वासच नाहीतर अभिमान आहेच. भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात आम्ही भारतीय आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तो टिकवून ठेवण्याची गरज आज भासू लागली आहे, कारण देश ढासळू पाहत आहे.

---------------

भारतीय स्वातंत्र्याची मुर्हुतमेढ १८५७ मध्येच रोवल्या गेलेली होती. या मुहुर्तमेढीवर भारतीय तिरंगा फडकविण्यास ९० वर्षाचा कालावधी लागला. या कालावधीत ही मुर्हुतमेढ अधिक सक्षम करण्यासाठी थोर क्रांतीकारकांचे बलिदान तसेच थोर नेत्यांची विचारसरणी व परिकाष्ठा लाभलेली आहे. तसेच या थोर नेत्यांची दिर्घ परंपरा सुध्दा या देशाच्या अस्तित्वाची साक्ष देते.

या स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनी अशा थोर नेत्यांचे स्मरण करुन त्यांच्या प्रती नतमस्तक होणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. या शुभदिनी आम्ही शपथपुर्वक संकल्प केला पाहिजे की, आमच्या देशाच्या स्वातंत्र्याची सुरक्षा करणे हे आमचे एकमेव ध्येय आहे व त्याकरिता आम्हाला निरंतर जागरुक राहण्याची गरज आहे.

आम्हा भारतीयांना मान नाही पण विदेशी माणसांना आमुच्या देशात फार मानानं सन्मानानी वागवलं जातं, ठिक आहे. तरी आम्ही ही शेवटी माणसं आहोत, याची जाणीव देखील येथील व्यवस्थेने ठेवावी. माणसा-माणसांत वितंडवाद होता कामा नये, ही खबरदारी शासनाची आहे.

भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणुन त्यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले ह्यजन गण मनह्ल हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले वन्दे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले.

भारतीय संविधानामुळेच देशाची प्रगत राष्ट्रामध्ये मान उंचावत आहे. तेव्हा संविधानाचा अवमान होता कामा नये, याची दक्षता सरकारने काटेकोरपणे घेण्याची गरज आहे, कारण सध्या तरी संविधानाचा अवमान होत असल्याच्या घटना देशात घडत असतांना शासन हातवारे करीत आहे, असं होता कामा नये. जर असं घडलंच तर त्या व्यक्तिचं नागरिकत्व खलास करण्याची तरतूद करुन त्याला दंडीत केले पाहिजे.

हा ७८ वा स्वातंत्रदिन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव्या भारतास घटना समर्पीत केली, तो आम्हाला भारतीय असण्याचा अभिमान आहे. पं. जवाहरलाल नेहरुंनी आराम हराम आहे हा मंत्र दिला, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडविली तर लाल बहादुर शास्त्रींनी जयजवान, जयकिसानचा नारा देत ताश्कंद करार केला.

प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांनी राजे व महाराजे यांचे तनखे बंद केले, बँकाचे राष्ट्रीयकरण केले. तसेच गरीबी हटाव चा नारा दिला, २० कलमी कार्यक्रम देशभर लागू करुन देशाला, अर्थव्यवस्थेला नविन आयाम देवून या देशात सामाजिक क्रांती घडविली आणि युवा नेते राजीव गांधी यांनी २१ व्या शतकातील ह्नमाहिती आणि तंत्रज्ञानह्ल असा भारत निर्माण करण्यास समर्थपणे पावले उचललीत. १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य मिळाले मात्र सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय खऱ्या अर्थाने सुराज्य निर्माण करता येणे शक्य नव्हते.

हा धागा पकडून विकासाच्या अनेक योजना जाणीवपूर्वक राबविण्यात आल्या. समाजातील तळागाळातील लोकांची प्रगती व विकास साधणे हा या मागील उद्देश होता. पण तो ही आजवर साध्य झालेला दिसत नाही, ही शोकांतिका म्हणावी लागेल.

भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. २६ जानेवारी १९५० रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो)

भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते.

परंतू अशा विपरीत आर्थिक कालखंडात सुध्दा भारत देश वेगळा पर्याय ठरु शकतो, असा एकमत प्रवाह होता. योग्य वैधानिक व कर प्रणाली



तसेच योग्य आर्थिक वातावरण उपलब्ध करुन दिल्यास भारत आणि भारतीय व्यवसाय जगातील उत्तमांपैकी एक होऊ शकतो आणि जग भारतात येण्याची इच्छा व्यक्त करेल, असा युक्तिवाद सुध्दा या विचारसरणीने केलेलाआहे.

हे सर्व देशाचे माजी पंतप्रधान मा.डॉ. मनमोहन सिंग यांच्याआर्थिक निती मुळे घडू शकले, ज्याचा पाया या देशाचे दिवगंत पंतप्रधान युवा नेते राजीव गांधी यांनी रचला होता. ही वस्तूस्थिती नाकारता येणार नाही. पण याचा बाऊ केला जात आहे हे देशहिताच्या विरुध्द आहे, खऱ्याला खरं म्हटलं पाहिजे.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

आज ग्रामीण भारताला एका मोठया आर्थिक तथा सामाजिक बदलाची गरज आहे. ज्यात शिक्षण, सुदृढ आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण विषयक, आर्थिक तसेच सामाजिक दर्जा सुधारणे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील उत्पादकता तसेच जीवनस्तर उंचावण्यास मदत होईल. सरकारने हे धोरण सक्तीने अंमलात आणले पाहिजे, तेव्हाच जीवनस्तर उंचावेल.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात.

आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात.

जन गण मन हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते.

इंग्रजांचा कावेबाजपणा ओळखणाऱ्या काहींनी त्यांच्या विरुध्द शस्त्र उगारले. १८५७ मधले स्वातंत्र्यसमर तात्या टोपे, झाशीची राणी, नानासाहेब पेशवे यांनी गाजवले. पुढे सशस्त्र उठाव करुन वासुदेव बळवंत फडके, क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू इत्यादींनी आपला निषेध शस्त्रांच्या उपयोगाने नोंदविला. काहींनी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या केली, सावरकर, धिंग्रा इत्यादींनी तसेच प्रयत्न केले.

स्वातंत्र्यासाठी जसे माणसं शहीद झाली तशी वंशावरही संकटे आली. लोकजागृती झाली पण दडपली गेली रानडे, टिळक, गोखले, आगरकर यांनी लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य वापरुन इंग्रजांकडून होणारा अन्याय आणि जुलूम यांची जनतेला जाणीव करुन दिली.

भारतीय समाजाला आपली स्थिती सुधारण्याची प्रेरणा दिली. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रयत्नाने जातीय भेदाभेद किती वाईट आणि त्यामुळे समाज कसा दुर्बल होतो हे लोकांच्या निर्दशनास आले.

बिझनेस कन्सर्न इन इंडिया या पाक्षिकामध्ये आम्हाला आमच्या देशाच्या इतिहासाचा थोर अभिमान आहे. आम्ही अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत स्वातंत्र्याची वाटचाल सुरु केली, परंतू इतर देशाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय व्यापार हाच आमच्याआजच्या भौतिक बदलास व आर्थिक स्वातंत्र्यास कारणीभुत असल्याचे आमचे ठाम मत आहे.

आमच्या देशाच्या मागील २० वर्षाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास, आम्ही आमचा जलद आर्थीक विकासास या नविन शतकाच्या सुरुवाती पासूनच सुरुवात केल्याचे स्पष्ट जाणवते, पण तिथेही ठोस अशी पाऊले उचललीत नाही.

बहुसंख्य तरुण भारतीयांच्या मते जुनी आर्थिक विषमता कालबाहय झालेली असून येणाऱ्या भविष्यात आम्हाला मोठया सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना पार करावयाचे आहे.

परंतू हे करतांना आम्हाला काही संकटांना समोरे जावेच लागेल, कारण पुढील १० वर्षेही आताच्या काळापेक्षा सर्वदृष्टीने वेगळे असतील आणि आम्हाला या काळात यशस्वी होण्याकरीता आयुष्याच्या सर्वच क्षेत्रात व्यापार, खेळ, आंतरराष्ट्रीय घडामोडीवर मात करावी लागेल. त्यासाठी ठाम निर्णय घेण्याची गरज आहे, तोंडदेखलेपणा नको. ते आज देशात घडत आहे, हे थांबलं पाहिजे.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आज ७७ वर्ष पूर्ण होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची अन् आनंदाची बाब आहे. स्वातंत्र्य दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वजण कटिबध्द होऊ या. तेव्हाच देश अराजकतेकडे जाणार नाही आणि लोकशाही जिवंत राहिल, याचं भान असणं गरजेचं आहे.

भारत माझा देश आहे आणि मी त्याचा मालक आहे हे आमच्या बापाने आम्हाला सांगितले आहे. कोणाच्या सांगण्यावरुन आम्हाला आमची देशभक्ती सिध्द करुन दाखवायची गरज नाही. आमची देशभक्ती आमच्या रक्तात भिनलेली आहे आणि ती डोळस आहे.

स्वातंत्र्य लढयात काडीचं ही योगदान नसणाऱ्यांनी आम्हाला देशभक्ती शिकवू नये. देश हा माणसांनी निर्माण होतो म्हणुन देशातला प्रत्येक माणुस हा सुरक्षित असणं म्हणजे देश सुजलाम सुफलाम असणं होय! म्हणूनच माणसांनी माणसाशी सौख्याने वागावे. ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा!

# हिंदुस्थानचा पहिला ध्वज फडकावणाऱ्या क्रांतिकारक 'मादाम कामा'

स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्वत्र राष्ट्रध्वज विक्रीसाठी आलेले पाहायला मिळत आहेत; मात्र हिंदुस्थानाचा पहिला राष्ट्रध्वज कोणी फडकावला हे आपल्यापैकी अनेकांना माहित नाही. हा भीमपराक्रम करणाऱ्या क्रांतिकारक मादाम कामा यांचा १२ ऑगस्ट हा स्मृतीदिन नुकताच सरला. युरोपात अटकेपार तिरंगा फडवणाऱ्या तसेच हिंदुस्थान्यांच्या धडावर मान आहे आणि यापुढे ती नेहमी ताठच राहील, असे ठणकावून सांगणाऱ्या मादाम कामा यांच्याविषयी जाणून घेऊ.

---------------



सोराबजी पटेल व जायजी या पारशी कुटुंबात २४ सप्टेंबर १८६१ या दिवशी भिकू उपाख्य मुन्नी हीचा जन्म झाला. पुढे शाळेत शिकत असतांना मुन्नीला वाचनाची सवय लागली. स्वतःला समेजल, पचेल अशा विषयांवर वाचनातील न पटणारे विषयही ती नजरेखालून घालीत असे. त्यामुळे दिवसेंदिवस तिच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत होत्या.

एकदा ब्रिटीश प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानच्या भेटीवर येणार होता. त्यामुळे जनतेने त्यांचे स्वागत करावे, असे आवाहन केले जात होते. मुन्नी विचार करत होती हा राजपुत्र कोण? याचा नि आपला संबंध काय? त्याच्यावर आपल्या निष्ठा त्या कसल्या? दूर देशांतून येणारा हा राजपुत्र आपला राजा कसा? स्वतःध्ये देशप्रेम असल्याशिवाय एखाद्याच्या मनात असे विचार येणे तरी शक्य आहे काय?

**सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई.**

ऑगस्ट १८८५ मध्ये मुन्नीचा रस्तुम कामाबरोबर विवाह झाला. ती आता भिकाजी रस्तुम कामा झाली होती; परंतु नियतीला हे लग्न मान्य नव्हते. भिकाजी ही रुस्तुम कामा यांचे घर सोडून परत वडिलांकडे रहावयास आली. लंडनमध्ये शामजी वर्मा, डॉ. पारिख, अब्दुल्ला मजिद, लाला लजपतराय, जे.सी. मुखर्जी ही मंडळी जाहीरपणे ब्रिटिशांविरुद्ध व्यासपीठ गाजवत होती.

दादाभाईंच्या लंडन इंडिया सोसायटीह्नतून त्यांनी आपल्या कार्याचा श्रीगणेशा केला. हाईड पार्कसारख्या सार्वजनिक व्यासपीठावरून त्यांनी आपले प्रखर विचार मांडण्यास सुरुवात केली. ही नवखी स्त्री थेट सिंहाच्या गुहेत शिरून आयाळ विस्कटते आहे, हे पाहून ब्रिटिशदेखील चक्रावले. ब्रिटिश त्यांना मॅडम म्हणत तर फ्रेंच, जर्मन त्यांना मादाम कामा असे पुकारत. अशा रितीने लवकरच भिकाजी या मादाम कामा या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. हे नाव काही दिवसांतच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे झाले. मादाम कामा हे नाव भविष्यात शेकडो क्रांतीकारकांना एखाद्या तेजःपुंज शलाकेसमान भासणारे होते.

एकदा महात्मा गांधींचा मुक्काम लंडनमधील इंडिया हाऊसमध्ये होता. मादाम कामाही लंडनमध्येच होत्या. गांधींची भेट मादाम कामा यांच्याशी झाली. बोलण्याच्या ओघात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा विषय निघाला. त्यावर कामा आवेशानं बोलू लागताच गांधीजी त्यांना म्हणाले, "Don't talk of I»»fdiÓs independece. परंतु कामा कसल्या ऐकतात! कामांनी गांधीजींना तितक्याच ताडकन सुनावले,

"India must have independence here & now."

आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसचे अधिवेशन जर्मनीतील स्टूटगार्ड येथे १८ ऑगस्ट १९०७ रोजी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मादाम कामा यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवण्याच्या संधीचे सोने करण्याचा पक्का निश्चय मादाम कामा यांनी केला. परिषदेत मांडावयाचा ठराव स्वा. सावरकर यांनी तयार करून दिला.

परिषदेच्या कामाकाजाच्या तिसऱ्या दिवशी कामा ठराव मांडणार होत्या. अधिवेशनाचे अध्यक्ष पॉल सिंगरे हे जर्मन समाजवादी होते. त्यांनी कामांना सांगितले की, या ठरावावर मतदान घेता येणार नाही; मात्र तो मांडून त्यावर बोलता येईल. कामांना हेच पाहिजे होते. मोठ्या रुबाबात त्या व्यासपीठावर आल्या. त्यांचा आवाज खणखणीत होता. प्रवाही होता. इंग्रजीवरही प्रभुत्व होते. विचारांची बैठक पक्की होती. मनात दृढ विश्वास होता.

मादाम कामांनी ठराव मांडला आणि पुढच्याच क्षणी त्यांनी दडवून ठेवलेल्या मातृभूमीचा तिरंगी ध्वज हातात धरीत फडकवला आणि आवेशपूर्ण शब्दांत समोरच्या प्रतिनिधीगृहाला उद्देशून त्या म्हणाल्या, "This is the flag of Indian Independence. Behold it is bon. It is already santified by the blood of Indian martyrs. I call upon you gentleman to rise and Salute the flag." इतिहासानेही श्वास रोखून पहावे असा तो क्षण होता!

स्वतंत्र हिंदुस्थानचा पहिला ध्वज फडकवला गेला तो युरोपच्या भूमीवर आणि तोदेखील मादाम कामासारख्या रणरागिणीच्या हस्ते! त्यानंतर सभागृहात टाळ्यांचा जो कडकडाट झाला तो न भूतो न भविष्यती असा होता. अगोदर ठरल्यानुसार कामांच्या ठरावावर मतदान होणार नव्हते. अध्यक्ष सिंगरे यांनी ठरावासंबंधी बोलण्याची परवारनगी दिली. त्यानुसार त्या बोलू लागल्या.

त्यांचा शब्द जणू ठिणगीच होती. विचारांचा वडवानल चेतवण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दांमध्ये होते. ठरावाच्या शेवटी त्या म्हणाल्या, ह्यह्यमी हा राष्ट्रध्वज आपल्यासमोर पुन्हा एकदा फडकवते आणि सांगू इच्छिते की, माझ्या जिवंतपणीच माझा हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याचा मला पहायचा आहे. वंदे मातरम्

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर हिंदुस्थानी स्वातंत्र्याचा आवाज उठविणारी ती पहिली वीरांगना ! आणि इतिहासाने नोंद करून ठेवावी असा तो सुवर्णक्षण. राष्ट्रध्वजाशी आपले काय नाते असते, हे ज्यांना ठाऊक आहे, त्यांनाच या क्षणाचे महत्त्व समजावे!

कामांनी स्वतःच वृत्तपत्र सुरू करण्याच ठरविले. अर्थातच त्याचे नाव वन्दे मातरम् ! नियतीने तर कामांच्या हाती वन्दे मातरम्चा आसूड दिला होता. वन्दे मातरम्च्या प्रत्येक अंकातून कामा इतके प्रक्षोभक नि जहाल लिखाण करीत की ते वाचून एखादा मृत व्यक्तीही जागचा उठून पेटून उठावा!

क्रांतिकार्यासाठी आवश्यक असणारे जागरण, संघटन आणि कृती या बाबींचे मार्गदर्शन क्रांतिकारकांना वन्दे मातरम्मधून होत होते! १९३५ च्या सुरुवातीला सर कावसजी जहांगीर युरोपला आले. ते कामांना भेटल्यावर कामा म्हणाल्या, कावसजी, माझा मृत्यू जवळ आलाय, पण मला इथ मरायचं नाही. मला माझ्या मातीत माझ्या मातृभूमीच्या कुशीत घेऊन चल. मृत्यूपूर्वी माझ्या मातृभूमीचं मला एकदा दर्शन होऊ दे!

स्ट्रेचरवर झोपलेल्या स्थितीतच कामांना बोटीत नेण्यात आले. त्यांना निरोप देण्यासाठी राणा तेवढे हजर होते. प्रत्यक्ष निरोप घेतांना कामा आणि राणा दोघांनांही अश्रू आवरेनात. बोट भारताच्या किनाऱ्याला लागली. कामांना खाली आणण्यात आले. त्यांनी हळू आवाजात कावसजींना सांगितले, कावसजी, तेवढी माती माझ्या हाती दे! ती हाती घेतांना कामांचे डोळे चमकले. समाधानाने त्या मंदपणे हसल्या व म्हणाल्या, हिच्यासाठीच तर मी इथे आले!

१९३६ मधील ऑगस्ट आला. कामांची प्रकृती अचानक बिघडली आणि त्याच स्थितीत १२ ऑगस्ट १९३६ रोजी दुपारी कामांनी इहलोकीची यात्रा संपवली. मायभूमीत देह ठेवण्याची त्यांची इच्छा अखेर नियतीलाही पूर्ण करावीच लागली! त्याच सायंकाळी त्यांचा देह पारशांचा डाकमामध्ये नेण्यात आला.

तेव्हा कुणा एकाचे लक्ष त्यांच्या हाताच्या मुठीकडे गेले. मुठीत काय असावे ते पाहण्यासाठी कामांच्या हाताची मूठ उघडली गेली तेव्हा त्या मुठीत पॅरिसमध्ये असतांना कामा छातीवर लावीत असलेले सोनरी ब्रुचर होत त्यावर अक्षरे कोरलेली होती.... वन्दे मातरम्!

# वंदे मातरम : भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. आपल्या स्वातंत्र्याला यावेश्री ७८ पूर्ण होत आहे. हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही त्यासाठी मोठा लढा लढावा लागला. या स्वातंत्र्य लढ्याचा बीज मंत्र वंदे मातरम हे गीत होते.

इंग्रजांच्या गुलामीतून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो क्रांतिकारकांनी प्राणाची बाजी पावली. हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. या हजारो हुतात्म्यांना फासावर लटकताना किंवा इंग्रजांच्या गोळ्या झेलताना शेवटचा शब्द होता तो म्हणजे वंदे मातरम.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

वंदे मातरम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे ब्रीदवाक्य होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. १८८५ पूर्वीचा तो काळ होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीला भारतीय जनता कंटाळली होती. इंग्रजांची ही जुलमी राजवट उलथवून लावण्यासाठी नागरिक एकत्र येत होते. अनेक छोटे मोठे समूह इंग्रजांविरुद्ध आवाज उठवत होते त्यामुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली होती.

अशा वातावरणात वंदे मातरम या गीताचा जन्म झाला. बंकीमचंद्र चॅटर्जी यांनी कोलकाता विश्व विद्यालयातून बी ए ची पदवी पूर्ण केली होती. इंग्रज सरकारने त्यांची कोलकात्याच्या डिस्ट्रिक मॅजिस्ट्रेटपदी निवड केली. नंतर ते कोलकात्याचे डिस्ट्रिक कलेक्टर बनले. बंकीमचंद्र चॅटर्जी हे जरी इंग्रजांच्या सेवेत होते तरी ते प्रखर देशभक्त होते.

१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे त्यांना खूप आकर्षण होते. १८५७ साली इंग्रजांनी त्यांचे गॉड सेव्ह द क्वीन हे राष्ट्रगीत भारतात रुजू करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे राष्ट्रगीत भरताचेच राष्ट्रगीत आहे असे भासवण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यामुळे बंकीमचंद्र चॅटर्जी खूप अस्वस्थ झाले. इंग्रज आपले राष्ट्रगीत भारतावर कसे थोपवू शकतात असा प्रश्न त्यांना पडला.

भारतीय लोकही इंग्रजांच्या राष्ट्रगीताचा तिरस्कार करीत होते. त्यांनी यावर गहन अभ्यास केला तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की हजारो वर्षांच्या गुलामगीरीमुळे भारत हा कधीच अखंड देश नव्हता त्यामुळे भारताला स्वतःचे राष्ट्रगीत नव्हते. म्हणून ७ नोव्हेंबर १८७६ रोजी त्यांनी भारत भूमीला मातृभूमी असे संबोधित करून तिचे नमन करणारे वंदे मातरम हे सहा कडव्यांचे एक देशभक्तीपर गीत लिहिले. त्यांनी हे गीत आपल्या मित्रांना म्हणून दाखवले. तेंव्हा मित्र त्यांना म्हणाले हे गीत भारताचे राष्ट्रगीत बनले पाहिजे. १८८२ साली बंकीम चंद्र चॅटर्जी यांनी आनंद मठ नावाची एक कादंबरी लिहिली. या कादंबरीत त्यांनी वंदे मातरम हे गीत समाविष्ठ केले. आनंद मठ या कादंबरीला लोकांचा खूप प्रतिसाद मिळाला. अल्पावधीतच ही कादंबरी लोकप्रिय झाली.

त्याकाळात लोकांनी त्या कादंबरीचे पारायण केले. त्यामुळे वंदे मातरम हे गीत देखील लोकप्रिय झाले. १८९६ साली काँग्रेसच्या कोलकता येथील अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी वंदे मातरम हे गीत गायले. या गीताने संपूर्ण अधिवेशन देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. १९०१ साली कोलकाता मध्येच झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सामूहिक रित्या हे गीत गाण्यात आले. सर्व भारतीयांना हे गीत तोंडपाठ झाले.

वंदे मातरम हे भारताचे राष्ट्रगीत आहे असे मानुनच लोक हे गीत गाऊ लागले त्यामुळे १९०५ साली इंग्रजांनी या गीतावर बंदी घातली. तरीसुद्धा बनारस विश्व विद्यालयात रवींद्र नाथ टागोर यांची पुतणी सरला देवी यांनी हे गीत गायले. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केली. या फाळणीच्या विरोधात झालेल्या प्रचंड आंदोलनात हे गीत जागृतीचा शंखनाद बनले.

हिंदू मुस्लिम सर्वांनी या गीताचे मुक्तकंठाने गायन केले. या फाळणी विरोधात लोक रस्त्यांवर उतरले अखेर इंग्रजांनी शरणागती पत्करून बंगालची फाळणी रद्द केली. इंग्रजांविरुद्ध लोकांना एकजूट करण्यात वंदे मातरम या गीताचा मोठा वाटा होता. वंदे मातरम हा शब्द क्रांतीचा समानार्थी शब्द बनला. जो तो आपल्या भारत भूमीला वंदन करुन म्हणजे वंदे मातरम गीत म्हणून स्वातंत्र्य लढयात सहभागी होऊ लागला.

१९०४ साली भगिनी निवेदिता यांनी भारताच्या राष्ट्रध्वजाची रूपरेषा तयार केली यात या ध्वजात वर हिरवा मध्ये पिवळा व तळाशी केशरी रंग होता. वरच्या हिरव्या रंगावर कमळाची आठ फुले होती. खालच्या केशरी रंगावर चंद्राच्या आणि सूर्याच्या आकृत्या होत्या तर मधल्या पिवळ्या रंगावर वंदे मातरम असे लिहिले होते. १९०७ साली बर्लिन येथे वंदे मातरम लिहिलेला भारताचा हा ध्वज फडकवण्यात आला होता.

लाला लजपतराय हे लाहोरहून एक पाक्षिक चालवत. या पाक्षीकाचे नावही वंदे मातरम हेच होते. देश स्वातंत्र्य झाल्यावर वंदे मातरम या गीताच्या पहिल्या कडव्याला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला आहे. आज देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करताना भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र बनलेल्या वंदे मातरमचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. वंदे मातरम!

■ ■ ■




# देशाची आन-बान-शान तिरंगा

शहिदांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची, क्रांतिकारकांची, थोरमहात्म्यांची आठवण रहावी, इतिहास जागृत रहावा, याद्दष्टीकोणातुन १५ ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवुन देशाची आन-बान-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे. तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे. यातूनच क्रांतीची मशाल उदयास आली व १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उजाडला.

यात सुर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतीमा, लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होवून देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की मेरा देश महान.

महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला वृक्ष लावण्याचा निर्धार करायला हवा. यामुळे १५ ऑगस्टला लावलेले वृक्ष क्रांतिकारकांच्या आठवणीच्या निमित्ताने अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील व संपूर्ण भारतात आपल्याला हिरवागार गालिचा दिसून येईल.

देशातील वाढते प्रदुषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतु भयभीत आहे. याकरीता १५ ऑगस्टचे औचित्य साधून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला झाडे लावण्याचा संकल्प करावा. या वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पुर्वज आशिर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे.

वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळेल.आपल्या पुर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.आज भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे पूर्ण होत आहे त्यानिमित्त्याने देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू आहे.ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक,जहालवादी नेते,मवाळवादी नेते यांच्या एकसुत्री कार्यक्रमाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेतो आहे.त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घरा-घरातुन आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी टक्कर घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोरमहात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवुन दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून आणि देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे पूर्ण होत असल्याचे पाहून प्रत्येकांनी १५ ऑगस्टला आप-आपल्या घरावर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा प्रण देशाच्या १४० कोटी जनतेनी घेतला पाहिजे.

असे जर झाले तर तिरंगा एवढ्या उंचावर गेलेला आपल्याला दिसेल की संपूर्ण जग आश्चर्य चकित होईल व म्हणतील खरोखरच भारत देश महान.कारण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी अनेक धर्माचे, पंथाचे, जातीचे व संस्कृतीचे लोक एकोप्याने रहातात. जेव्हा देशाच्या एकतेचा आणि अखंडतेचा प्रश्न येतो तेंव्हा तेव्हा एकनिष्ठेने कार्य करतात. त्यामुळे भारतातील १४० कोटी जनता आप आपल्या घरावर तिरंगा फडकवुन जगाला आपली ऐकता अवश्य दाखवेल.

कारण भारतातील छोटे-मोठे सर्वच जाणतात की देश स्वतंत्र करण्यासाठी शुरविरांना, क्रांतिकारकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या, बलिदान द्यावे लागले,फासावर जावे लागले, घर-दार सोडावे लागले तेव्हाच भारत स्वतंत्र झाला. आपण शुरविरांना, क्रांतिकारकांना, थोरमहात्म्यांना सुईच्या टोकायेवढीही मदत करू शकत नाही. परंतु १५ ऑगस्टला प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन आपल्या पुर्वजाच्या आठवणी ताज्या करू शकतो.

आजही प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात आपल्या पुर्वजांच्या आठवणी आहेत व स्वाभिमान आहे यात दुमत नाही.कारण जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत भारत भुमितील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्यवीरांना, शहिदांना, क्रांतिकारकांना, थोरमहात्म्यांना आपल्या काळजात ठेवून स्मरणात ठेवील.आपले पुर्वज आपल्याला कुठुनतरी अवश्य पहात असेलच त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन शहिदांना स्मरण केले पाहिजे.

याच दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन वाढत्या प्रदूषणावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामुळे प्रत्येक झाडाच्या पानात,फुलात आपल्याला क्रांतिकारकांचे दर्शन अवश्य होईल. आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान अबाध्य रहावा यासाठी अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर दिसून येतात.त्यामुळे तिरंगा देशातील सिमावर्ती भागातील सैनिकांसाठी भारतमातेचा आत्मा आहे.जय हिंद!

■ ■

# स्मार्ट सिटी प्रकल्प : १५०० कोटींची कामे अधांतरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :
नऊ वर्षांपूर्वी गाजावाजा करून सुरू केलेल्या स्मार्ट सिटी योजनेला केंद्र सरकारने मार्च २०२५ पासून निधी देणे बंद केले. त्यामुळे राज्यात या योजनेतून सुरू असलेल्या १५५५ कोटी रुपयांच्या योजनेचा भार राज्य सरकार आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनाच उचलावा लागणार आहे.




लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर पडलेला ताण आणि महापालिकांची बिकट आर्थिक स्थिती लक्षात घेतली तर या योजना पूर्णत्वास जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

केंद्र सरकारने जून २०१५ रोजी स्मार्ट सिटी मिशन ही योजना सुरू केली. देशातील १०० शहरांची यासाठी निवड करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील आठ महानगरांचा समावेश होता.

या योजनेत आठ शहरांमध्ये एकूण ३४७ प्रकल्पांची (किंमत १६,९८० कोटी) कामे सुरू करण्यात आली होती. त्यापैकी ९ वर्षांत ३२८ (किंमत १५,४२४.८९ कोटी) कामे (९५ टक्के) पूर्ण झाली. १९ प्रकल्पांची (किंमत १५५५ कोटी) कामे शिल्लक आहेत.

सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांनी महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी योजनेची सद्यःस्थिती काय, याबाबत प्रश्न विचारला होता. त्यावर शहर विकास मंत्रालयालयाने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने ३१ मार्च २०२५ला ही योजना बंद केली. या योजनेच्या सूत्रानुसार स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून ५० टक्के व राज्य सरकार आणि संबंधित महापालिकेला ५० टक्के निधी खर्च करायचा होता.

केंद्राने योजना बंद केल्याने त्यांच्याकडून मिळणारा ५० टक्के निधी आता मिळणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील ८ शहरांमध्ये सुरू असलेल्या एकूण १५५५ कोटी रुपयांचे १९ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खर्चाचा सर्व भार हा राज्य सरकार आणि संबंधित महापालिकेवर पडत असल्याची माहिती आहे.

# नागपुरचे सह पोलीस आयुक्त रेड्डींसह चार जणांना राष्ट्रपती पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
भारतीय पोलीस सेवेत अत्यंत प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या राष्ट्रपती पोलीस पदक पुरस्कारांची स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. यात नागपुरातील विद्यमान सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासह नागपूर पोलीस दलातून आणखी तीन पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यात सहाय्यक पोलीस आयुक्त नरेंद्र कृष्णराव हिवरे, उप महानिरीक्षक प्रमोदकुमार परशराम शेवाळे, उपनिरीक्षक अनिल कृष्णराव ब्राह्मणकार यांचा समावेश आहे.

राष्ट्रपती पदक पोलीस पुरस्कारासाठी राज्यातून निवड झालेल्या अन्य पोलीस अधिकाऱ्यांमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त दत्तात्रय शंकर ढोले, उप पोलीस अधीक्षक संजय सुभाष चांदखेडे, सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेन्द्र रघुनाथ ढिवर, ज्योती अरविंद देसाई, राजन आबाजी माने, पोलीस निरीक्षक, दीपककुमार चुडामन वाघमारे, रवींद्र अंबुजी वाणी, उपनिरीक्षक संदीप शांताराम शिंदे, संदीप यशवंत मोरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक काशिनाथ दत्त राऊळ, रमेश नथूजी ताजणे, धोंडिबा माधवराव भुट्टे, हर्षकांत काशिनाथ पवार, प्रमोद कारभारी पवार, आंचल ईश्वरप्रसाद मुदगल, उपनिरीक्षक जोसेफ मॅरियन डिसिल्वा, सुनील भाऊराव चौधरी, पोलीस निरीक्षक सत्यवान आनंद माशाळकर, सतीश भगवान जाधव, ओहसिंग द्वारका पाटलेसहाय्यक उपनिरीक्षक अशोक सोनू जगताप, दीपक सुगनसिंग परदेशी, राजेंद्र गोपाळराव मोरे, जितेंद्र जगन्नाथ कोंडे, संजय दामोदर शिरसाट, उप पोलीस अधीक्षक बालासाहेब यशवंत भालचिम, आनंदराव मारुती पवार , सहाय्यक कमांडंट सुरेश दिगंबर कराळे, रमेश बाबन वेठेकर, सुभाष माधुकर हांडगे, पोलीस निरीक्षक विश्वास पाटील, सहाय्यक उपनिरीक्षक अविनाश नावेरे, अनंत व्यवहारे, हेड कॉन्स्टेबल संजीवकुमार काशी माथूर, रमेश खुशालराव कुंभाळकर यांचा समावेश आहे.

या खेरीज महाराष्ट्रातून अग्निशमन अधिकारी, भगवत श्रीराम सोनवणे, स्टेशन ड्युटी अधिकारी, सुभाष प्रभाकर जाधव, उपमुख्य अग्निशमन अधिकारी छगन ताराचंद मोरे, लीडिंग फायरमन, भगवंत बाबन शिंगाडे, फायर इंजिन चालक रामचंद्र तुकाराम गोसावी यांचा समावेश आहे.

कारागृह सुधार सेवेबद्दल कारागृह अधिक्षक राणी राजाराम भोसले , अतिरिक्त अधिक्षक राजाराम रावसाहेब भोसले , उप अधीक्षक गजानन काशिनाथ सरोदे, सुभेदार संजय गंगाराम शिवगण, हवालदार सुधाकर ओंकार चव्हाण, राजेश माधुकर सावंत, संजय सदाशिव जाधव आणि कारागृह शिपाई भारत धेंबरे यांचा समावेश आहे.

## नक्षल विरोधी सेवेबद्दल चार जणांना विशेष पुरस्कार

राज्यातील नक्षल प्रभावित जिल्ह्यामध्ये सलग तीन वर्षे खडतर परिस्थितीत सेवा देणाऱ्या पोलीसांना गृह विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला पोलीस महासंचालक कार्यालयातर्फे विशेष सेवा पदकेही प्रदान केली जातात. यात राज्यातील नक्षल प्रभावित जिल्ह्यांमधील ५१ पोलीसांना विशेष पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

यात नागपूरातून वैशाली बाबुराव कुकडे (शेंडे), लक्ष्मी सोमाजी गोखले, शितल वसंत खडसे, शिला मधुकर बडोले या महिला पोलीसांसह राजेश नत्थुजी सोनटक्के यांची निवड करण्यात आली. या पाचही जणांनी गडचिरोली सारख्या नक्षलप्रभावित जिल्ह्यांमध्ये सलग तीन वर्षे खडतर सेवा दिली.

# निलंबनानंतर चव्हाणांना सरचिटणीसपदाची बक्षिसी

## मारहाण करणाऱ्या चव्हाणला प्रमोशन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



लातूरमध्ये प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्यासमोर छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाटगे यांना मारहाण केल्याप्रकरणी पक्षातून निलंबित करण्यात आलेले राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी प्रदेश अध्यक्ष सूरज चव्हाण यांना तीन आठवड्याच्या आतच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रमोशन दिले.

चव्हाण यांची आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी वर्णी लावण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल घाटगे यांच्यासह छावाच्या पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

विधिमंडळात ऑनलाईन रमी खेळणारे तात्कालिन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात छावाचे पदाधिकारी विजय घाटगे यांनी २० जुलै रोजी लातुरात तटकरेंसमोर पत्ते फेको आंदोलन केले होते. याच रागातून सूरज चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी घाटगे यांना तटकरेंसमक्ष बेदम मारहाण केली होती.

या प्रकरणी चव्हाण यांच्यासह ९ जणांना अटक व लगेच सुटकाही झाली होती. या कृत्यामुळे राज्यभर संताप व्यक्त होत असल्यामुळे २३ जुलै रोजी अजित पवार यांनी चव्हाण यांना पक्षातून निलंबित केले होते, त्यांचे युवक प्रदेशाध्यक्षपदही काढून घेतले होते. त्यामुळे छावाचा राग काहीसा शांत झाला होता. मात्र या घटनेनंतर तीन आठवड्यातच अजित पवारांनी सूरज चव्हाण यांना प्रमोशन देत थेट राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती दिली.

# खाटिक समाजावर प्रत्येकवेळी अन्याय का?

## शिंदेसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
स्वातंत्र्य दिनी राज्यात मांस विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यावरून विरोधी पक्षांनी भाजपवर ते -राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अजेंडा राबवत असल्याची टीका केली आहे. अजित पवार यांनी मांस विक्री चुकीची असल्याचे म्हटले आहे. शिंदेसेनेच्या आमदाराने त्यांच्या सुरात सूर मिसळला आहे.

फडणवीस सरकारने १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला मांस विक्री बंदीचा आदेश काँग्रेसच्या कार्यकाळापासूनच काढला जातला जात असल्याचा दावा केला आहे. या राजकीय वादात खाटिक समाजाचे नेते म्हणून शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांनी सरकारच्या आदेशाला थेट विरोध केला नाही. परंतु मॉलला सुट आणि छोट्या मांस विक्रेत्यांवर बंदी का? असा सवाल उपस्थित केला.



ते म्हणाले, आम्ही मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवण्यास तयार असल्याचे सांगितले. मात्र, त्याच बरोबर मॉल आणि मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेलमधून होणाऱ्या मांसाहारी पदार्थांच्या विक्रीवरही बंदी घालण्याची मागणी त्यांनी केली आहे. प्रत्येक वेळी छोट्या दुकानदारांवर अन्याय का केला जातो, असा सवलाही तुमाने यांनी केला आहे.

खाटिक समाज, मच्छीमार, चिकन विक्रेते हे सर्व गरीब लोक आहेत. प्रत्येक वेळी त्यांच्यावर अन्याय करणे योग्य नाही. छोट्या खाटिकांचे दुकान बंद केले जातात. मात्र, पॅकिंग मध्ये मोठ्या हॉटेलमध्ये ते सर्व मिळते. मोठ्या मॉलमध्ये पॅकिंग स्वरूपात मिळणाऱ्या मांसाहारी पदार्थांच्या विक्रीवरही सरकारने बंदी घातली पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

सरकारचा आदेश असेल तर मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्यास आमचा विरोध नाही. मात्र फक्त गरीबांवरच बंदी लादल्या जात असेल तर त्यास आमचा विरोध असल्याचे तुमाने यांनी स्पष्ट केले.

# अमरावती शहराला ड्रग्जचा विळखा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १४ :
गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील रॅलिज प्लॉट परिसरातील एका घराच्या छतावर सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर छापा टाकून दहा जणांना अटक केली आणि एमडी (मेफेड्रॉन), गांजा आणि विदेशी मद्य जप्त केले.

नागपुरी गेट पोलिसांनी एका तस्कराला अटक केली. त्याच्याकडून ३ लाख रुपये किमतीचे एमडी जप्त करण्यात आले. शहरात अमली पदार्थांची तस्करी वाढल्याचे चित्र या कारवाईच्या निमित्ताने उघड झाले आहे.

रॅलिज प्लॉट परिसारात प्रमेंद्र ओमप्रकाश शर्मा हा त्याच्या घराच्या छतावर काफिला नावाने हुक्कापार्लर काही दिवसांपासून चालवीत होता. अवैध हुक्कापार्लरवर धाड टाकली. येथून हुक्का स्पॉट, सुगंधित फ्लेवरचे डबे, हुक्का पिण्याच्या उपयोगात येणाऱ्या नळ्या, एमडी आणि गांजा मिळून आला.

अमरावती शहर आता ड्रग्जच्या विळख्यात सापडले असून, तरूणाई व्यसनाच्या आहारी जाऊ लागली आहे. परिणामी, शहर पोलीस आयुक्तालयाने ऑपरेशन वाईप ऑउट ही मोहीम हाती घेतली आहे.

# पावसाचा जोर वाढणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
भारतीय हवामान खात्याने १३ ते १५ पर्यंत राज्यातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. दरम्यान, १३ ऑगस्टला राज्यातील बहूतांश ठिकाणी आणि प्रामुख्याने विदर्भातील काही जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्टयामुळे वारे तिथून पुढे ढकलले गेले आहेत. त्यामुळेच राज्यातील हवामानान पुन्हा एकदा बदल अपेक्षित आहेत.

मोसमी पावसाने तब्बल दोन आठवडे राज्यातून विश्रांती घेतली होती. त्यानंतर १२ ऑगस्टपासून पावसाला सुरुवात झाली. तर १३ ते १५ ऑगस्टपर्यंत हवामान खात्याने प्रामुख्याने विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. आता येत्या १६ ऑगस्टपासून पुन्हा एकदा विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. यावेळी अनेक भागात पूराची शक्यता देखील असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.
विदर्भात नागपूरसह इतर जिल्ह्यांमध्ये मूसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
या पावसामुळे नद्या आणि नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भाप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही जोरदार पावसाची अपेक्षा आहे.

# लाडकी बहीण योजनेमुळेच महायुतीला २३८ जागा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
१५०० रुपयांत महिलांचा स्वाभिमान विकत घेतला, असा आरोप करणाऱ्या विरोधकांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनिल तटकरे यांनी आज जोरदार प्रत्युत्तर दिलं.

सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्यांना लाडकी बहीण योजना काय समजणार? ही योजना अजितदादांनी आणल्यानेच महायुतीला २३८ जागांचा प्रचंड विजय मिळाला, असा पलटवार त्यांनी मुंबईत भरलेल्या राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या आढावा बैठकीत केला.

मतदार यादीत आक्षेप नोंदवण्याची वेळ तेव्हा असते, पण विरोधकांनी तीच संधी सोडली. आता निराधार टीका करतायेत, पराभव पचविणे त्यांना जड होत आहे, असेही तटकरे म्हणाले.



















स्वातंत्र्य दिन
निमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा
श्री विजयराव सावळकर
कंत्राटदार, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार,

# खरेच आपण स्वतंत्र झालो आहोत का?

आज आपण ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या धुमधडाक्यात साजरा करत आहोत. अनेक मोठ्या शहरांत ठिकठिकाणी विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी, प्रभात फे-यामिरवणुका, संगीत मैफिल, मिठाई वाटप, विविध करमणुकीचे कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे, यात तिळमात्र शंका नाही; आणि देशप्रेम म्हणून तो साजरा करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्यकर्तव्यच आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पंतप्रधान, मुख्यमंत्री, अनेक मंत्री, खासदार, आमदार हे सालाबादप्रमाणे ठरलेले 'साचेबध्द' भाषण(?) ठोकून; आणि 'फोटोसेशन' करून मोकळे होतील.

परंतु, आज देशात अमिबासारखी पसरत चाललेली गुन्हेगारी; आणि त्यातील अल्पवयीन मुलांचा समावेश, रोज महिलांवर होणारे अत्याचार, गगनाला भिडत चाललेला शेतक-यांच्या आत्महत्यांचा चढता आलेख, रोज वाढत चाललेली बेरोजगारी, दिवसेंदिवस गरीब हा अधिक गरीब होत आहे. तर, श्रीमंत हा अजून श्रीमंत होत आहे, बेशरम मंत्र्यांचे अत्यंत अश्लील असे वर्तन आणि बकासुरासारखे त्यांचे हजारो कोटींचे घोटाळे, काही नालायक कारभा-यांनी आज राजकारणाचा केलेला 'हमिदाबाईचा कोठा', स्वायत्त संस्था आणि संविधानावर होत असलेली चिखलफेक, प्रक्षोभक आणि चिथावणीखोर वक्तव्य करून जातीजाती व धर्माधर्मांमध्ये हेतूपुरस्सर तेढ निर्माण करण्याचे फालतू उद्योग आदी कारणांवरून आज आपण खरेच स्वतंत्र झालो आहोत का? हा गंभीर प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

आज, एकीकडे 'देशप्रेमा'ला भरती आल्याचे सुखद चित्र दिसेल. पण, दुसरीकडे हृदय हेलवणारे दु:खद चित्र बघायला मिळाल्यास आश्चर्य वाटायला नको. आज आपण जरी ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत असलो तरी, अनेक ग्रामीण, आदिवासी भागात शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते, दळणवळणाची साधनेच पोहोचलेली नाहीत. तेथील अनेक नागरिकांना आपले मुख्यमंत्री आणि पंतप्रधान कोण आहेत? हेच माहित नाही. थोडक्यात, तेथे स्वातंत्र्याचा सूर्य आजही उगवलेला नाही. काही महिन्यांपूर्वी गडचिरोली जिल्ह्यातील भटपार गावातील एका तरुणाला आपल्या जखमी वृध्द पित्याला मित्राच्या सहाय्याने खाटेची कावड बनवून, अक्षरशः चिखल तुडवत १८ किमी. अंतर पार करत भामरगड येथील रुग्णालयात न्यावे लागले. वृध्दाचा पाय फ्रॅक्चर झाला होता. अपार कष्टाने रुग्णालयात आणले खरे. पण, येथे शस्त्रक्रियेची सुविधा तर नव्हतीच, परंतु संतापजनक बाब म्हणजे, गडचिरोलीला नेण्यासाठी रुग्णवाहिकेचीही सोय नव्हती. अखेर अर्धवट उपचार करून त्यांना गावाकडे परतावे लागले. पाठोपाठ अशीच दुर्दैवी घटना नाशिक जिल्ह्यातील (शहरी भागात?) इगतपुरी तालुक्यातील चिखलदरा गावात उघडकीस आली. अश्विनी आंबेकर नावाची महिला सर्पदंशाने बेशुद्ध झाली. तिला तातडीने उपचार मिळणे गरजेचे होते. पण, येथेही 'भ्रष्ट' आणि 'सुस्त' प्रशासनाचा 'भोंगळ' कारभार आडवा आला. जवळच असलेल्या सोनेशी गावापर्यंत जाण्यास पूलच नसल्याची धक्कादायक गोष्ट समोर आली. पायवाटेवर कमरेइतके पाणी होते. अश्विनीच्या शरीरात विष भिनत चालले होते. वेळ दवडण्यात अर्थ नसल्याने, अखेर तिच्या पतीनेही आपला जीव धोक्यात घालण्याचे ठरविले. तिला खांद्यावर टाकत सोनेशी गाव गाठले. तेथून खासगी वाहनाने घोटी येथील रुग्णालयात दाखल केले. या पाठोपाठच अजगरासारख्या 'सुस्त' पडलेल्या 'भ्रष्ट' प्रशासनाच्या 'अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणा-या दोन घटना समोर आल्या. नंदूरबार येथे एका मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी त्याच्या नातेवाईकांना शवासह भर पावसात 'जीव मुठीत धरून' पूर आलेली नदी पार करावी लागली. त्या अभागी मृत व्यक्तीला आपल्या जीवनाच्या अखेरच्या प्रवासालाही संकटाचा सामना करावा लागला, यापेक्षा दुसरे दुर्दैव काय असावे? संपूर्ण देशात पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द असलेल्या माथेरानची परिस्थिती अतिशय भीषण आणि विदारक आहे. येथे सरणासाठी लागणा-या लाकडांसाठी नातेवाईकांना चक्क ३ किलोमीटर लाकडे गोळा करण्यासाठी श्रमदान करावे लागते. दुर्दैव म्हणजे, एवढे करूनही हाल पिच्छा सोडत नाही. लाकडे ओली असल्याने अंत्यसंस्कारासाठी अनेक संकटांना तोंड देत, मानसिक त्रास सहन करावा लागतो. स्मशानभूमीत कायमचा लाकडांचा तुटवडा कसा असू शकतो? याविषयीचे निवेदन नागरिकांनी अनेकवेळा नगरपालिकेला दिले. परंतु, 'झोपेचे सोंग' घेतलेल्या प्रशासनाला काही जाग येत नाही. याहीपेक्षा संतापजनक बाब म्हणजे, ७५ लाख रुपये खर्च करून विद्युतदाहिनी बसविण्यात आली आहे. परंतु, गेल्या २ वर्षांपासून ती बंदच असल्याचे वाचण्यात आले. त्याबाबतही नागरिकांनी अनेकवेळा निवेदने दिलीत. पण, त्यांनाही 'केराची टोपली' दाखवण्यात आली.

अनेक ग्रामीण भागात आजही शालेय विद्यार्थी, गरोदर महिला, ज्येष्ठ रुग्ण यांना 'तारेवरची कसरत' करत, चिखल तुडवत, खाटेवर किंवा खांद्यावर बसवत नदी पार करावी लागते. पाण्यासाठी तर अनेक महिलांचे जीवही गेले आहेत; आणि आजही जात आहेत. अनेक मोठ्या शहरांत 'रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्ता' अशी गंभीर स्थिती रस्त्यांची झाली आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे, अनेक वर्षे खितपत पडलेला 'मुंबई-गोवामहामार्ग. आणि नवीनच झालेल्या 'समृद्धी' महामार्गाला गेलेले तडे. या खड्ड्यांमुळे अनेक निष्पाप नागरिक जायबंदी झालेत. तर, काही जीवालाही मुकले आहेत. तरीसुद्धा 'गेंड्याची कातडी' असणा-या प्रशासनाला पाझर फुटत नाही.

कार्यालय नगर परिषद वरुड,
जि. अमरावती
वरूड शहरातील सर्व नागरीकांना
स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

जाहिर सुचना
1 ) सर्व नागरीकांनी आपल्या घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि जमा झालेला कचरा घंटागाडी मध्ये टाकावा.
2 ) डेंग्यू, हिवताप व चिकनगुणीयाचे डास स्वच्छ पाण्यात तयार होत असल्यामुळे घरातील टाके, राजन, माठ व इतर भांडी आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करावी व कोरडा दिवस पाळावा.
3 ) सिंगल यूज प्लॉस्टिक पिशव्यांचा वापर बंद करावा.
4 ) शौचालयास उघड्यावर बसु नये.
5 ) आपल्या घरातील व दुकानातील दररोज निघणारा ओला व सुका कचरा जमा करण्यासाठी 2 डस्टबिन ठेवावी व घंटागाडी धारकास सोपवावा किंवा नगरपरिषदेचे ट्रॅक्टरमध्ये टाकावा.
6 ) बांधकामाची साहित्य विटा, गीट्टी, दगड सार्वजनिक रस्त्यावर टाकु नये.
7 ) नागरीकांनी आपली जनावरे मोकाट सोडु नये, तसेच सार्वजनिक गल्लीत रस्त्यावर बांधु नये
8 ) आपल्या घरातील शौचालयाच्या पाईपला जाडी बसवावी.
9 ) शिळे, उघडे पदार्थ फळे खाऊ नये.
10 ) नळाला टोट्या बसवुन पाण्याचा अपव्यय टाळावा.
11 ) आपल्या घराजवळ वृक्षारोपण करुन त्याचे संवर्धन करावे
12 ) नगरपरिषद घरपट्टी व पाणीपट्टी कराचा नियमित भरणा करुन नगरपरिषदेला सहकार्य करावे.

श्री. गजानन भोयर
प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगर परिषद वरुड, जि. अमरावती

समस्त देशवासीयांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
आमदार डॉ.संजयजी कुटे यांच्या अभिनव कल्पकतेतुन आणि विकासात्मक दृष्टीकोनातुन जळगांव जामोद मतदार संघाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या
प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकिय अधिक्षक कार्यालय व प्रसुतीगृह, शवविच्छेदन गृह, तहसिल कर्मचारी निवासस्थान, तहसिल कार्यालय व अंबाबरवा येथे बंजी इजेक्शन, स्कायलाईन, झिपलाईन, टेंट रिसॉर्ट
इत्यादी बांधकामाचा सुमारे 20 कोटी रुपये किमतीच्या विकास कामांचा
लोकार्पण सोहळा
- शुभहस्ते -
श्री.मा.आ.डॉ.संजयजी श्रीराम कुटे
आमदार, जळगांव जामोद विधानसभा
शुक्रवार दि.15 ऑगस्ट 2025

| क्र. | कामाचे नांव | किंमत | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | धानोरा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकाम | 331 लक्ष | सकाळी 11.00 वा. |
| 2 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे शवविच्छेदनगृह इमारत बांधकाम | 85 लक्ष | दुपारी 12.00 वा. |
| 3 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे वैद्यकिय अधिक्षक कार्यालय बांधकाम | 87 लक्ष | दुपारी 12.10 वा. |
| 4 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे आयुष्यमान भारत अंतर्गत प्रसुतीगृह नुतणीकरण | 67 लक्ष | दुपारी 12.20 वा. |
| 5 | संग्रामपुर येथे शासकिय सामाईक निवासस्थान बांधकाम | 681 लक्ष | दुपारी 12.30 वा. |
| 6 | संग्रामपुर येथे नविन तहसिल कार्यालय इमारत बांधकाम | 680 लक्ष | दुपारी 01.00 वा. |
| 7 | अंबाबरवा येथे स्कायलाईन,बंजी इजेक्शन, झिपलाईन व टेंट रिसॉर्ट निर्माण करणे. | 100 लक्ष | दुपारी 02.00 वा. |

- प्रमुख उपस्थिती -
मा.डॉ.किरणजी पाटील, जिल्हाधिकारी,बुलडाणा
मा.डॉ.दत्तात्रयजी बिराजदार, जिल्हा शल्यचिकित्सक, बुलडाणा
मा.राहुलजी एस.टोलीया, उपवनसंरक्षक,अकोट वन्यजीव विभाग
मा.डॉ.अमोलजी गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी,बुलडाणा
मा.शैलेंद्रजी काळे, उपविभागीय अधिकारी,जळगांव जामोद
मा.एकनाथजी तळेले, कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग,खामगांव
मा.श्री.सुशिलजी गुडदे, कार्यकारी अभियंता,जि.प.बा.विभाग,बुलडाणा

- विनित -
प्रशांत पाटील, तहसिलदार, संग्रामपूर
डॉ.उल्हास भराड, वैद्यकिय अधिक्षक,ग्रा.रु.जळगांव जामोद
डॉ.उज्वला पाटील, तालुका आरोग्य अधिकारी,जळगांव जामोद
अजय बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी,सोनाळा
प्रविण फुंडकर, स.अ.श्रेणी-1 सा.बा.उपविभाग,जळगांव जा.
संजय गोरे, उपविभागीय अधि.जि.प.बां.विभाग,जळगांव जामोद

समस्त देशवासियांना
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :-
अधिकारी, कर्मचारी
विद्युत वितरण केंद्र कोकर्डा,
ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

स्वातंत्रता दिन
निमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
श्री शरदराव तायडे
चांदूर बाजार
श्री सुमीतदादा तायडे
चांदूर बाजार

१५ ऑगस्ट
स्वतंत्रता दिवस
निमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
किशोरभाऊ अर्डक
माऊली कंस्ट्रक्शन
चांदूर बाजार, जि. अमरावती

समस्त नागरिकांना
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :-
श्री. शंकर बादशे
सचिव - ग्रामपंचायत कोकर्डा
ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती

१५ ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन
निमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा
आमदार चंदू उर्फ
उमेश यावलकर

१५ ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन
निमित्त सर्व
नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
माजी आमदार देवेंद्र भुयार

# स्मार्ट सिटी प्रकल्प : १५०० कोटींची कामे अधांतरी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
नऊ वर्षांपूर्वी गाजावाजा करून सुरू केलेल्या स्मार्ट सिटी योजनेला केंद्र सरकारने मार्च २०२५ पासून निधी देणे बंद केले. त्यामुळे राज्यात या योजनेतून सुरू असलेल्या १५५५ कोटी रुपयांच्या योजनेचा भार राज्य सरकार आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनाच उचलावा लागणार आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर पडलेला ताण आणि महापालिकांची बिकट आर्थिक स्थिती लक्षात घेतली तर या योजना पूर्णत्वास जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

केंद्र सरकारने जून २०१५ रोजी स्मार्ट सिटी मिशन ही योजना सुरू केली. देशातील १०० शहरांची यासाठी निवड करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील आठ महानगरांचा समावेश होता.

या योजनेत आठ शहरांमध्ये एकूण ३४७ प्रकल्पांची (किंमत १६,९८० कोटी) कामे सुरू करण्यात आली होती. त्यापैकी ९ वर्षांत ३२८ (किंमत १५,४२४.८९ कोटी) कामे (९५ टक्के) पूर्ण झाली. १९ प्रकल्पांची (किंमत १५५५ कोटी) कामे शिल्लक आहेत.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांनी महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी योजनेची सद्यःस्थिती काय, याबाबत प्रश्न विचारला होता. सूत्रानुसार स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून ५० टक्के व राज्य सरकार आणि संबंधित महापालिकेला ५० टक्के निधी खर्च करायचा होता. केंद्राने योजना बंद केल्याने त्यांच्याकडून मिळणारा ५० टक्के निधी आता मिळणार नाही. त्यामुळे ८ शहरांमध्ये सुरू असलेल्या एकूण १५५५ कोटी रुपयांचे १९ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व भार हा राज्य सरकार आणि संबंधित महापालिकेवर पडतो आहे.




## ६९ लाखांची फसवणूक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :**
शेअर ट्रेडींगसह फॉरेक्स ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देतो, असे आमिष दाखवून करीत सायबर चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये मिळून ६९ लाख रुपयांची फसवणूक केली आहे.

शेअर ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देतो, अशी बतावणी करीत सायबर चोरट्यांनी धायरीतील तरूणाला ३३ लाख ४६ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला आहे. फिर्यादीनुसार मोबाइल धारकांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराला सायबर चोरट्याने जादा परताव्याचे आमिष दाखविले. त्यांचा विश्वास संपादित करून अवघ्या दीड महिन्यांत ३३ लाखांवर रुपए ऑनलाईनरित्या वर्ग करण्यास भाग पाडले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली.

# मनपाच्या निष्काळजी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करा!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
शहरातील भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणाबाबत न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांची ओळख पटवून त्यांची नावे नोंदवण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिका आणि पोलिस आयुक्तांना दिले आहेत.

### भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाचे आदेश



न्यायालयाने यापूर्वी २०२२ मध्ये भटक्या कुत्र्यांना पकडण्याचे, नसबंदी करण्याचे आणि लसीकरण करण्याचे आदेश दिले होते, परंतु या निदेशांचे प्रभावीपणे पालन झाले नाही. वारंवार पालन न केल्याबद्दल नाराजी व्यक्त करत न्यायालयाने म्हटले आहे की या चुकीसाठी जबाबदार असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना, म्हणजेच महापालिका आयुक्तांपासून ते कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांपर्यंत, जबाबदार धरले जाईल.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने म्हटले आहे की, स्पष्ट आदेश असूनही, शहरात भटक्या कुत्र्यांचे हल्ले सुरूच आहेत. या समस्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यात महानगरपालिका अपयशी ठरली आहे, असा आरोप करणारी अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की प्रशासनाने नसबंदी कार्यक्रम योग्यरित्या राबविला नाही किंवा सार्वजनिक सुरक्षेच्या समस्यांकडे लक्ष दिले नाही.

न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने महापालिकेच्या निष्काळजीपणावर कडक टीका केली. न्यायालयाने महापालिका आयुक्त आणि विभाग प्रमुखांसह सर्व निष्काळजी अधिकाऱ्यांची नावे नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्य पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनाही त्यांची भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# वनक्षेत्रालगतची खासगी जमीन सरकार घेणार लीजवर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
राज्य शासनाचा वन विभाग आता राज्यातील वनक्षेत्रांच्या आसपासची खासगी जमीन लीजवर घेणार आहे. यासाठी मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना-२०२५ चा आराखडा तयार करण्यात आला असून लवकरच त्याची तांत्रिक छाननी झाल्यानंतर तो जनतेसमोर हरकती व सूचनांसाठी मांडला जाणार आहे. या योजनेला अंतिम मंजुरी मंत्रिमंडळाकडून दिली जाईल.

### मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना

राज्यात वारंवार वन्यजीवांच्या हल्ल्यांमुळे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होत असते. यासंदर्भात वनमंत्री गणेश नाईक यांनीही पावसाळी अधिवेशनात मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी आणि या घटनांना आळा घालण्यासाठी. खासगी जमीन लीजवर घेऊन तिचा वापर विशिष्ट प्रकल्पांसाठी करण्यासंदर्भात योजना तयार करण्याचे आश्वासन दिले होते.

तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही यासंदर्भात बैठक घेतली होती. राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीचे अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्यासंदर्भात योजना तयार करणार निर्देश दिले होते. त्याच पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे आणि वनक्षेत्रालगत सुरक्षित व शाश्वत आर्थिक उपक्रमांना चालना देणे हा आहे. ही योजना केवळ वन्यजीव संवर्धनाला बळकटी देणार नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवी दिशा देणार आहे. असे वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

**क्षेत्रानुसार ठरवणार लीजचा दर**

राज्यातील विविध विभागातील जमिनीचा दर हा वेगळा आहे. त्यामुळे लीजचा दर क्षेत्रानुसार ठरवला जाईल, कारण संपूर्ण राज्यासाठी एकसमान दर लागू करणे शक्य नाही. उदाहरणार्थ, महामार्गालगतच्या जमिनीचा वार्षिक भाडेप्रति एकर ५०,००० पर्यंत असू शकतो, तर दुर्गम ग्रामीण भागात तो दर १०,००० इतकाही असू शकतो. त्या दृष्टीने हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

**जमिनीच्या वापरासाठी अनेक पर्याय**

शासनाकडून लीजवर घेण्यात येणाऱ्या खासगी जमिनीवर बांबू लागवड, सौरऊर्जा प्रकल्प, पामारोजा गवतापासून सुगंधी द्रव्य निर्मिती यांसह ८ ते १० पर्यायी प्रकल्प राबवण्याचा विचार आहे. या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील लोकांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल आणि वन्यजीवांचा मानवी वस्त्यांकडे होणारा कलहही कमी होईल.













